महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र


रजि. नं. महा./285/98/ नागपूर


संपादक : दिगंबर गाडगीळ

- वर्ष – चौदावे
- अंक १ ला
- १ ऑक्टोबर २०२३
- पाने –२४





निनाद अभंग

# क्षणचित्रे




मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने प्रकाशित केलेल्या चेक लिस्ट ऑफ बर्ड या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर किरण मोरे यांच्या रानपिंगळाच्या छायाचित्राला मान मिळाला




निनाद अभंग यांचे – ब्लॅक ब्रेस्टेड विव्हर चे छायाचित्र जागतिक पक्षी संकेतस्थळ ई–बर्ड च्या वेबसाईटवरील मुखपृष्ठावर झळकले





## महाराष्ट्र पक्षीमित्र व निसर्ग कट्टा तर्फे पक्षीकट्टाचे आयोजन

महाराष्ट्र पक्षीमित्रच्या सदस्यांची नियमित भेट व्हावी तसेच नविन पक्षीमित्र घडविण्यासाठी नियमितपणे पक्षिनिरीक्षणाचे कार्यक्रम व्हावे यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी सकाळी ७.०० ते ९.०० या दरम्यान पक्षीकट्टाचे आयोजन पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला येथे महाराष्ट्र पक्षीमित्र व निसर्ग कट्टा तर्फे करण्यात येते

## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक - ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११

## सहाय्यक संपादक

**श्री. किरण मोरे,**अमरावती, मो. ९९२३९१००३४
Email: kiranmorey1983@gmail.com

**श्री. दिलीप विरखेडे,** वर्धा , मो. ७७७५८८३८६१

---

## कार्यकारिणी


| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | - | **डॉ. राजू कसंबे,** ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | - | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे,** अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | - | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | - | **श्री. शरद आपटे,** सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | - | **डॉ. अनिल माळी,** नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | - | **प्रा. डॉ. निनाद शाह,** सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | - | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | - | **श्री. दिलीप विरखडे,**वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | - | **श्री. अविनाश कुबल,**ठाणे<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | - | **कु. रूपाली मढवी,**मुंबई<br>**मो. ९८६९५५९९२२** |


## सल्लागार मंडळ


| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (नाशिक) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## कुठे गेले सारस क्रेन?



**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षीमित्र अंक
dgadgil09@gmail.com

उत्तर भारतात मोठ्या संख्येने असलेले सारस क्रेन विदर्भाच्या खाली सरकले नाहीत. नाशिक जिल्ह्यात एके काळी सारस होते असे म्हणतात. भाषावार पुनर्रचना झाली त्यापूर्वी डांग नाशिक जिल्ह्याचा भाग होता तिथे सारस होते असे म्हणतात. पण मी कधी नाशिक जिल्ह्यात सारस पाहिले नाहीत.

मी सारस पाहिले सुमारे तीस वर्षापूर्वी भरतपूरला. एका शेतात शेतकरी काम करीत होता. जवळच सारसाची जोडी निर्भयपणे वावरत होती. कदाचित या आत्मविश्वासी स्वभावामुळेच सारस कमी झाले असावेत. त्यांच्या हत्येमुळे त्यांच्या रहिवासाचा होत असलेला ऱ्हास हेही कारण आहेच.

सारस हा महाराष्ट्रातील सर्वात उंच पक्षी. किंचित करडे अंग, गळा आणि लाल रंगाची असून, पाय दिसतो. मला आठवते, त्यांच्यासाठी निर्भयवस्ती करण्यासाठी विदर्भात महाराष्ट्रात पक्षीमित्र संस्थेमार्फत जमीन विकत घेण्याचा प्रयत्न होता. पण पुरेसा निधी न जमल्याने तो विचार सोडून द्यावा लागला, हे दुर्दैव.

एक सारस पक्षी एका मोटारसायकल सोबत पळत असल्याचे प्रकाशचित्र पाहिल्याचे मला आठवते. हा त्याचा खेळकर स्वभाव. अजूनही वऱ्हाडाच्या दोन जिल्ह्यात सारस येतात ते मध्यप्रदेशातून. त्यांनी कायमस्वरूपी महाराष्ट्रात राहावे ही इच्छा व्यक्त करून थांबतो.
५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर हा पक्षीसप्ताह साजरा करणार ना?

*****

**मुखपृष्ठ छायाचित्र - ब्लॅक ब्रेस्टेड विव्हर छायाचित्रकार - निनाद अभंग, पुणे**

## * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

पक्षी प्रजातींच्या दृष्टीने भारत देश व भारतीय उपखंड संपन्न असा प्रदेश असून या ठिकाणी जगातील १४ टक्केपेक्षा जास्त प्रजाती आढळून येतात. अलीकडे आपल्या देशातसुद्धा वाढत्या पक्षी निरीक्षकांच्या मदतीने इ-बर्ड सारख्या संकेत स्थळावर पक्ष्यांची माहिती गोळा होत असते. त्यातून देशभरातील पक्ष्यांच्या स्थितीवर लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. भारतातील पक्ष्यांची सद्यस्थिती विषद करणारा स्टेट ऑफ इंडिअन बर्डस २०२३ (SoIB) चा अहवाल ऑगस्ट महिन्याच्या शेवटी दिल्लीत प्रसिद्ध करण्यात आला. एसओआयबी चा पहिला अहवाल यापूर्वी २०२० मध्ये जाहीर करण्यात आला होता. आताच्या या दुसऱ्या अहवालात ३० हजार पेक्षा जास्त पक्षी निरीक्षकांच्या ३० दशलक्ष नोंदी व निरीक्षणे पडताळण्यात आली. त्यानुसार प्राप्त माहितीवरून या अहवालातील अनुमाने काढण्यात आलीत. लोकविज्ञान अर्थात सिटीझन सायन्स वर आधारित ही माहिती असून अशा अभ्यासासाठी सिटीझन सायन्सचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या अहवालात भारतात नियमित आढळणाऱ्या ९४२ प्रजातींची माहिती तपासण्यात आली असून त्यावरून प्रजातींचा आढळ विस्तार, संख्येमधील चढ-उतार व संवर्धनाची आवश्यकता इत्यादी बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. यामध्ये २१७ प्रजाती ह्या गेल्या आठ वर्षापासून स्थिर दिसत असून १७८ प्रजातींच्या संवर्धनाकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे दिसून आले आहे. खूप साऱ्या प्रजातींची संख्या झपाट्याने कमी होत असून ही जगभरातील पक्षी अभ्यासकांसाठी आणि एकूणच पर्यावरणासाठी धोक्याची घंटा आहे. या अहवालानुसार काही पक्ष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून आले असून यामध्ये, कबुतर, मोर, वटवट्या व कोकीळ आदी पक्ष्यांचा समावेश आहे. नैसर्गिक अधिवासाचा ऱ्हास होत असल्याने या पक्ष्यांची संख्या वाढत असावी असे अनुमान काढण्यात आले आहे. मोर हा पक्षी विरळ व झुडपी जंगलात जास्त आढळून येणारी प्रजाती असून आता ही प्रजाती प. घाटातील पूर्वी घनदाट असलेल्या भागात तसेच हिमालयाच्या उंचीच्या भागात सुद्धा सर्रास आढळून येत आहे. अशा पक्ष्यांची वाढती संख्या हा सुद्धा चिंतेचा विषय असून यांची संख्या वाढल्याने इतर प्रजातींवर त्याचा विपरीत परिमाण होण्याचा संभव आहे. या अहवालातील आकडेवारी बघता पक्ष्यांची घटती किंवा वाढती संख्या हा चिंतेचा विषय असून यावरून अनेक पक्षी प्रजाती व त्यांच्या अधिवास संवर्धनाची तातडीची निकड असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या अहवालात प्रकाशित केलेल्या माहिती व्यतिरिक्त या संदर्भातील सखोल माहिती soib.in या वेबसाईटवर दिलेली असून यामध्ये प्रत्येक प्रजातींचे विस्तार नकाशे तसेच प्रत्येक राज्याची स्वतंत्र माहिती दिलेली आहे. आपण या वेबसाईट भेट देऊन आपल्या भागातील प्रजातींची किंवा आपल्याला उत्सुकता असलेल्या विषयाची माहिती जाणून घ्यावी. अहवाल प्रकाशित झाल्यानंतर या विषयी अधिक माहिती आपल्या सभासदांना व्हावी यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र वेबिनार मालिकेत नुकतेच बर्ड काउंट इंडियाचे श्री.अश्विन विश्वनाथन यांचे सप्टेंबर महिन्यात एक ऑनलाईन व्याख्यानसुद्धा आयोजित करण्यात आले होते. यामध्ये त्यांनी या अहवालात महाराष्ट्रातील निरीक्षणे बाबतची सखोल माहिती दिली होती.

महाराष्ट्र पक्षीमित्रकडून पक्षी अभ्यासावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करावा अशी चर्चा किंवा मागणी बरेच दिवसापासून होती. त्या दृष्टीने शालेय विद्यार्थ्यांसाठी एक अभ्यासक्रम लवकरच सुरू करण्यात येणार आहे. महाराष्ट्र पक्षीमित्रचे जेष्ठ सभासद डॉ. अनिल माळी यांनी पुढाकार घेऊन हा अभ्यासक्रम विकसित केला असून महाराष्ट्र पक्षीमित्रकडून मान्यताप्राप्त असा हा अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम ८ वी व ९ वी च्या शालेय विद्यार्थ्यांसाठी निर्माण केला गेला असून इच्छुक शाळेच्या मुख्याध्यापक व प्रकल्प मार्गदर्शक शिक्षकांच्या सहकार्याने शालेय स्तरावर राबविला जाणार आहे. या अभ्यासक्रमासाठी शाळांनी पुढे येऊन आपल्या विद्यार्थ्यांचा सहभाग यामध्ये नोंदवावा असे आवाहन महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे करण्यात येत आहे.

यावर्षीचे ३६ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन सांगली येथील बर्ड साँग या संस्थेच्या यजमानपद खाली येत्या डिसेंबर महिन्यात ख्रिसमस सुट्टीला लागून शनिवार व रविवार दि. २३-२४ डिसेंबर या तारखेला होणार आहे. संमेलनाचा मुख्य विषय हा पक्ष्यांची पिसे असा असून या विषयावर प्रथमच अनेक तज्ज्ञ व अभ्यासकांकडून या संमेलनात माहितीचे आदानप्रदान होणार आहे. याशिवाय शहरीकरणाचा पक्ष्यांच्या जीवनावर होणारा परिणाम, शेतीतील पक्षी आणि त्यांचा शेतीवर होणारा

परिणाम व पँच बर्डींग हे इतर विषय सुद्धा संमेलनाचे उपविषय म्हणून समाविष्ट असतील. संमेलनाच्या आधीच्या दिवशी One day National level seminar on Bird Vocalization या विषयावर एका चर्चासत्राचे सुद्धा आयोजन केले जाणार आहे. या संमेलनाची व चर्चासत्राची वेगवेगळी नोंदणी करावी लागणार असून नोंदणीची प्रक्रिया सुरु झाली आहे. यासाठी आपण आयोजकांशी संपर्क साधू शकता. या संमेलनास सुद्धा पक्षिमित्रांचा उत्स्फूर्त सहभाग लाभेल यात शंकाच नाही.

यावर्षीपासून महाराष्ट्र पक्षीमित्र स्व. प्रकाश गोळे महाराष्ट्र पक्षीमित्र शिष्यवृत्ती सुरु करण्यात येत आहे. तरुण पक्षी अभ्यासकास ही फेलोशिप प्रदान केली जाणार आहे. यावर्षीसाठी श्री. उदय वझे, अकोला यांचेकडून यासाठी रु. ११०००/- इतका निधी प्राप्त झाला असून याबाबतची माहिती लवकरच आपल्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे आणि येत्या ३६ व्या संमेलनात शिष्यवृत्ती जाहीर करण्यात येईल. संमेलनात सहभागी होणाऱ्या पक्षिमित्रांमधून एकास दुर्बीण भेट देण्याची घोषणा श्री. उदय वझे यांनी केली असून त्यासाठी नोंदणी झालेल्या सहभागामधून एक नाव लकी ड्रॉ मधून निवडण्यात येऊन संमेलनात ही भेटवस्तू प्रदान करण्यात येणार आहे.

भारतीय पक्षिविश्व व पक्षिअभ्यासशास्त्रास जागतिक स्तरावर पोहोचवणारे पै. डॉ. सालिम अली व महाराष्ट्रातील तमाम पक्षीनिरीक्षकांसाठी कायम आदरस्थानी असलेले ऋषितुल्य व्यक्तिमत्व आदरणीय मारुती चितमपल्ली या दोहोंच्या जन्मदिवसानिमित्ताने महाराष्ट्र पक्षीमित्रकडून २०१७ पासून सुरू केलेला पक्षी सप्ताह पुढील महिन्यात येऊ घातला आहे. यावेळी हा सप्ताह नेमका दिवाळीच्या आधी येत आहे. महाराष्ट्र पक्षीमित्रतर्फे या सप्ताहात काही विशेष कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. फक्त महाराष्ट्रातच साजरा होणारा अशा प्रकारचा सप्ताह साजरा करण्यासाठी आपण या सप्ताहात आपल्या जिल्ह्यात कार्यक्रमांचे आयोजन करावे, सदर आयोजनामध्ये स्थानिक वन विभाग, शैक्षणिक संस्था यांनासुद्धा सहभागी करून घ्यावे. चला तर मग या सप्ताहाचे नियोजन करण्यास सुरुवात करू या.

*****

## छायाचित्रांचे प्रदर्शन

दौंड येथील प्रसिद्ध छायचित्रकार श्री.विनोद कबनूरकर यांनी काढलेल्या वन्यजीव व पक्षी यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन ( सोयरे वनचरे) आणि त्यांच्या षट्यब्दीपूर्तीचा कार्यक्रम दिनांक १७ सप्टेंबर रोजी हॉटेल प्राईम स्क्वेअर दौंड येथे दिमाखात पार पडला.

या प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ पक्षीतज्ज्ञ श्री. दिगंबर गाडगीळ व विभागीय वनअधिकारी श्री.संजय कडू यांच्या हस्ते करण्यात आले. २०१६ साली नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेतल्यानंतर श्री.विनोद कबनूरकर यांनी त्यांच्या अंगी उपजत असलेल्या छायाचित्रण कलेला निसर्ग व जंगल भटकंतीची जोड दिली आणि बघता बघता त्याचे छंदात रूपांतर झाले.नाशिक येथील नेचर फिल संस्थेबरोबर त्यांनी पाहिली जंगल सफारी केली.त्यानंतर समविचारी मित्रपरिवार सोबत घेऊन किंवा एकट्याने त्यांनी अनेक जंगले,अभयारण्ये पालथी घातली.या प्रत्येक सहलीत त्यांनी वन्यजीव व पक्षी यांची हजारो छायाचित्रे काढली.त्यातील निवडक एकसष्ट छायाचित्रांचे प्रदर्शन त्यांनी वयाची साठ वर्षे पूर्ण केल्याचे औचित्य साधून त्यांच्या पत्नी सौ. स्वाती, कन्या स्वरदा व कबनूरकर कुटुंबीयांच्या संकल्पनेतून भरवले होते .

या कार्यक्रमात मिलिंद देशमुख , विजय कडू , रचना संस्थेचे प्रमुख राज काझी, विराज फरांदे , निवेदिता गवई ,राजश्री बिराजदार



तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दिगंबर गाडगीळ ,संजय कडू यांनी आपली मनोगते व्यक्त केली.विनोद कबनूरकर यांचा हरहुन्नरी स्वभाव,दौंडमधील सांस्कृतिक व सार्वजनिक क्षेत्रातील सक्रिय सहभाग, कुटुंबाप्रती असणारा कर्तव्यभाव, पन्नाशीनंतर जोपासलेला आगळा वेगळा छंद, त्याच्या पूर्तीसाठी त्यांनी घेतलेला ध्यास , चिकाटी व सातत्य या गुणांचा वक्त्यांनी उल्लेख केला व त्यांचे अभिष्टचिंतन केले.आकांक्षा पाठक यांनी शास्त्रीय नृत्यरचना सादर करून कार्यक्रमाची रंजकता वाढवली.श्री.धनंजय खराडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

# अनोखे प्रणयाराधन



**मनोज बिंड**
अमरावती
8668380772

'।। ले तो आये हो हमे, सपनो के गांव मे ।
प्यार की छाव मे बिठाये रखना ।।''

विदर्भातील एप्रिल महिना तसा पक्षी छायाचित्रणाच्या दृष्टीने फारसा उत्साहवर्धक नसतो. कोरड्या आणि कमालीच्या तीव्र उन्हामुळे अंग भाजायला लागते. परंतु याच काळात तलाव आणि मोठमोठ्या जलाशयातील पाण्याची पातळी खूप खालावते. याचा परिणाम म्हणून चिखलयुक्त काठ उघडे पडतात. एरव्ही विस्तीर्ण असलेले पाण्याचे पटल संकोच पावते आणि पात्रात बऱ्याच आत पाऊल टाकता येते. भरपूर चिखल असल्याने त्यावर सूक्ष्मजीव–अळ्या–कीटक–चिखलपक्षी अशी एक सलग जैवसाखळी परिपोषित होते. ज्यांना अशा वातावरणात निसर्गदर्शन, अभ्यास करायचा आहे त्यांच्याकरिता एक नवा आयाम खुला होतो.

त्यादिवशी सकाळी जरा उशिराच म्हणजे साधारण ८ वाजताच्या सुमारास कॅमेरा घेऊन तलावाच्या काठावर हजर झालो. समोर काही मोठी लालसरी बदकं (Red crested Pochard) पाण्याच्या मध्यभागी अन्न टिपत होती. लालसरी स्थलांतर करून साधारणपणे ऑक्टोबरमध्येच या भागात चांगल्या संख्येत पोहोचतात. परंतु त्यावेळी जलाशये पाण्याने तुडुंब भरलेली असल्यामुळे त्यांचे दुरूनच निरीक्षण करावे लागते. बहुतांशवेळी पाण्याच्या अगदी मध्यावर हे विहरत असल्यामुळे माझ्याजवळ त्यांचे चांगले फोटो नव्हतेच. यावेळी पुरेसे जवळ पोहोचण्यास ही योग्य संधी होती. तलावाच्या काठावर ४०–५० फूट आधीच पोटावर झोपलो आणि हळूहळू त्यांच्या दिशेने घसरण सुरू केली. काठावर पोहोचायला अजून १०–१५ फुटाचे अंतर बाकी असेल. मला अजिबात घाई करायची नव्हती म्हणून तिथे स्तब्ध झालो. कारण माझी पुढची छोटीशी हालचालही लालसरी बदक आता टिपू लागले होते. इतक्या जवळ पोहोचून मला आता अजिबात धोका पत्करायचा नव्हता. जवळपास पाऊणतास अगदी निपचिप पडून डोळे मात्र लालसरी वर रोखलेले होते. एवढ्यात काहीतरी हालचाल झालेली डोळ्याच्या डाव्या कोपऱ्याला जाणवली. छोटा कंठेरी चिखल्या (Little Ringed plover) ची एक जोडी हळूच माझ्या डाव्या हातावर साधारणपणे २० फुटावर उतरली होती. मी अगदी निपचिप पडून असल्यामुळे त्यांच्यासाठी माझे अस्तित्व नसल्यातच जमा होते. यापूर्वी यांचे बरेच फोटो टिपले असल्यामुळे मी विचलित न होता माझ्या मुख्य लक्ष्याकडे डोळे लावून बसलो आणि एवढ्यात चिखल्या पक्ष्याच्या नराने नेहमीपेक्षा वेगळीच हालचाल केल्याचे जाणवले. आता मात्र मान वळवून तिकडे बघणे भाग होते. ती जोडी अधूनमधून आपले अन्न टिपताना त्यातला नर नाजूक मंजुळ शीळ घालत होता, नेहमी हे पक्षी उडून जातात तेव्हा आवाज करतातच पण ही शीळ अधिक हळूवार आणि गोड वाटली. त्या आवाजात एक आर्तता आता जाणवत होती. हळूहळू मादीसुद्धा त्याच्याभोवती रुंजी घालू लागली आणि यापुढचे दृश्य मात्र इतके वेगळे आणि अनोखे होते की जर त्यादिवशी मी ते टिपले नसते तर कित्येक वर्षे मला खंत नक्कीच वाटली असती. नर जरासा थांबला, त्याने आपले दोन्ही पंख बाजूला विस्तारले. शेपटाच्या पिसांचा अक्षरशः पंखा केला. मान पुढच्या बाजूने झुकवली आणि मादी सावधपणे आणि हळूच त्याच्या या शेपटीच्या पंख्याखालील सावलीत विसावली. खरं सांगतो, डोक्यावर एप्रिल महिन्यातला तापलेला सूर्य, त्या नराने आपल्या शेपटीच्या पंख्याने धरलेली सावली आणि त्याखाली विसावलेली 'ती'.... कवीकल्पनासुद्धा थिटी पडावी असे हे दृश्य होते. हे नक्कीच 'प्रणयाराधन' होते कारण ५–६ सेकंदानंतर मादी पुन्हा हळूच बाहेर आली, स्तब्ध उभी राहिली, नरसुद्धा तिला थोडाफार खेटला. तिची मर्जी संपादून मुख्य 'प्रणय' सुरू झाला. प्रणयापूर्वी अन्न देऊ करणे, शरीराशी लगट करणे अशी प्रणयाच्या पूर्वतयारीची कित्येक उदाहरणे मी पक्ष्यांमध्ये पाहिली आहेत. परंतु अशा जगावेगळ्या अनोख्या २ 'अनुनयाचा' साक्षीदार होण्याचं भाग्य मला लाभलं, हे अजूनही खरं



वाटत नाही. या प्रसंगातील काव्यात्मकता क्षणभर बाजूला ठेवून त्याबद्दल काही शास्त्रीय माहिती मिळण्याची शक्यता पडताळून बघावी असे वाटले. त्यानुसार ठोस माहिती मिळाली नाही पण काही अभ्यासकांशी केलेल्या चर्चेनुसार या विणीच्या काळात नराच्या जननेंद्रीयाच्या ग्रंथींमधून मादीला आकर्षित करणारा गंध नक्कीच स्त्रवत असावा. हा गंध म्हणजे नर मीलनाच्या दृष्टीने आणि वंशवृद्धीकरीता सक्षम असल्याचा सबळ संकेत असावा आणि मादी निसर्गदत्त ज्ञानाने नराच्या शेपटाखाली जाऊन नेमकी याचीच खात्री करत असावी. कंठेरी चिखल्याच्या प्रणयाचे प्रसंग उन्हाळ्यात बरेचदा निरीक्षणास येतात परंतु वरील दृश्य नेहमी दिसत नाही याचे कारण काय असावे, याबाबत एक तर्क मांडला जाऊ शकतो. नराचा वयात येण्याचा हा पहिलाच हंगाम असेल आणि मादीला त्याच्या सक्षमतेची परीक्षा बघण्याची ही अक्कल निसर्गाने आश्चर्यकारकरीत्या बहाल केली असावी, यावर सगळ्यांचे एकमत झाले. तूर्तास याबद्दल काहीतरी ठोस निष्कर्ष काढण्यासाठी अधिक अभ्यास होणे गरजेचे आहे. मात्र त्यादिवशी त्या जोडप्याचे असे वागणे ही केवळ त्या एकाच वेळची अपवादात्मक बाब नव्हती हे मी ठामपणे म्हणू शकतो. कारण मी मंत्रमुग्ध होऊन पुढचा आणखी तास दीड तास तसाच पडून होतो, याच काळात त्यांनी पुन्हा दुसऱ्यांदा असाच प्रणय रंगवला.

*****

## स्वागत नविन सभासदांचे

### (दिनांक ०१ जुलै २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३)

| Membership No. | Name of Member | Place/ District |
|---|---|---|
| 1488 | Mr. Darshan Naik | Goregaon Mumbai |
| 1489 | Mr. Yogesh. V. Sakhare | Amravati |
| 1490 | Mr. Vikrant Prashant Awachat | Pune |
| 1491 | Mr. Prasad N. Joshi | Jogeshwari Mumbai |
| 1492 | Mr. Mangesh Nishikant Jamble | Sindhudurg |
| 1493 | Adv. Sheikh Ajim S. Salim | Akola |
| 1494 | Prof. Shivaji Darandale | Ahmadnagar |
| 1495 | Mr. Ranjeet Rane | Pune |
| 1496 | Mr. Swapnil K. Hasabnis | Goregaon Mumbai |
| 1497 | Dr. Pravin S. Bankar | Akola |
| 1498 | Ku. Janvhi Jadhav | Vikroli Mumbai |
| 1499 | Dr. Vasant Ghurde | Amravati |
| 1500 | Mr. Saurabh P. Jawanjal | Amravati |
| 1501 | Mr. Akash Shahaji Chavhan | Dharashiv |
| 1502 | Mr. Mahendra N. Bhamare | Nashik |
| 1503 | Mr. Vivek Amrute | Thane |
| 1504 | Dr. Sudhir G. Bhatwadekar | Kolhapur |
| 1505 | Mr. Rushikesh R. Sankpal | Pune |
| 1506 | Ku. Krushnapriya H. Patil | Chopda |
| 1507 | Mr. Sunil Tekchand Harinkhede | Gondia |
| 1508 | Dr. Sudhir Hasamnis | Pune |

# दयावंत दयाळ ची दया...



**सीमा तंगडपल्लीवार**
नाशिक रोड
9921773672

रोज तीनका तीनका करून इवल्या इवल्या हातात (चोचीत) जितके मावेल तितके घरबांधणीसाठी सामान गोळा करणे चालू झाले, अगदी आळीपाळीने... कुठेच तक्रार नव्हती की मीच का करू की आज मी खूप केलं, आता तू कर... कुरबुर नाही चिडचिड नाही, आवाज चढवून बोलणे नाही की काही नाही...अगदी शांतपणे समजूतदारपणे आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळत होते दोघेही.. स्त्री, पुरुष भेदभाव कुठेही दिसत नव्हता.. तो तिची काळजी खूप घेत होता हे दिसत होते.

झालं ४, ५ इंचाचे टुमदार घर (काड्यांचे) बांधून झालं आणि आता खरी कसोटी चालू झाली ती दोघांची पण... संसार वाढवायचा त्यासाठी खमका बाबा आणि एका पायावरची तारेची कसरत करणारी आई यांची पळापळ बघताना खूपदा डोळे नकळत पाणावत होते. खरेच काय वाटत असेल त्यांना, काय भावना असेल त्यांच्या ह्या कळायला हव्या होत्या असे खूप वाटत होते.

घरटे बांधून झाल्यावर आयत्या घरट्यात नागोबा सिल्व्हर बिल (पांढऱ्या कंठाची मनोली), सिनेरिस्ट टीट (रामगंगार) अशा अनेकांनी बळकावण्याचा वेडावाकडा प्रयत्न केला, पण ह्या बाबाने त्यांना सरळ रस्ता दाखवला. त्यानंतर मात्र वाकडे तोंड करून पण बघितलं नाही कोणी...

खूप कौतुक वाटायचे, तो बाहेर उभा असायचा आणि ही आत.. तिच्या जीवाला अजिबात धक्का लागू देत नव्हता.. पहिलटकरीण होती की काय!!?? हे कळायला मला मात्र तितकं ज्ञान नव्हतं... पण एव्हाना बरीच बाळंतपण (बुलबुल, मुनिया, इंडियन रॉबिन आणि आता हे दयाळ magpie) केलेले नव्हे, बघितलेले अनुभवले असल्यामुळे काय खबरदारी घ्यायची हे नक्कीच कळलं होतं निरीक्षणावरून अनुभवावरून ..

एके दिवशी म्हणजे साधारण एक महिन्यानंतर १७ जुलैला अचानक दुपारी ११, १२ च्या सुमारास रोजच्या पेक्षा वेगळा भीतियुक्त काळजीयुक्त आवाज आला, म्हणून गॅलरीत गेले तर सातभाई, मैना आणि बुलबुल बाजूच्या झाडावर होते आणि हा बाबा त्यांना जाऊन डिवचत होता पण त्या टस नाही की मस नाही.. आणि दूर बसून नाजूक आवाजात आई पण ओरडत होती... साधारण १०, १५ मिनिटे हा प्रकार बघितला मी, आणि माझी Tube पेटली, की घरात नक्कीच कुणीतरी येणार येणार गं असे काहीतरी घडले आहे म्हणून हा आकांततांडव चालला आहे, लगेच मी त्या सगळ्यांना हाकलले.. आणि इथून पुढे मी पण खूप सावध झाले.. कारण ह्या आधी चिरकने तीनदा, मुनियाने तीनदा बाळं जन्माला घातली. ही पण निसर्गनियम निसर्गचक्र ह्यांच्या चक्रात अडकून बाळं बाहेर पडलीच नाही, कोणाचा तरी घास बनून घशात गेली..

आठ दिवस मात्र मी घराच्या बाहेर पडले नाही .. सकाळी वॉक ला जायचे तेव्हा काय असेल ते घेऊन येत होते, भाजी दूध इ. पण मुद्दाम कुठे गेले नाही... ह्या दोघांची जोडी खूपच हटके होती हे मात्र खरं... राजबिंडा आणि रूपमती अशी ही जोडी... हंऽऽ तर मग त्या दिवशी सगळ्यांना हुसकवल्यावर मात्र जरासे डोकावून बघितले. अगदी जरासे कारण आधीच दोघांच्याही जीवाची तळमळ आकांततांडव बघून माझा जीव होत नव्हता अजून त्यांना त्रास द्यायचा.घरट्यात एकदम आतल्या बाजूला जरासा खोल भाग केलेला होता त्यात अंडी सदृश आकार नव्हता पण थोडं काळसर असं काहीसे दिसलं आणि काय सांगू इतका आनंद झाला की लगेच माझ्या एका पक्षिमैत्रिणीला फोन लावला आणि सगळ्यात पहिल्यांदा तिला ही गोड बातमी दिली.. जणू काही मीच पहिल्यांदा आई होते आहे की काय! अहो, गंमत सांगू, गंमत म्हणू की हा योगायोग की चमत्कार...

काय असेल ते असेल पण १८ तारखेला डोकावलं तर अधिक महिन्याची सुरुवात अशी काही चमत्कारिक होईल असं स्वप्नात पण वाटलं नव्हतं. पण निसर्गाने चक्क माझ्या पदरी अधिकाचे अधिक दान टाकले होते आणि तीन गोंडस बाळकृष्ण नुकतीच अंड्यातून बाहेर आलेली. आता मात्र जबाबदारी खरेच खूप वाढली होती कारण ह्या वेळेस मला कसेही करून त्यांना जपायचे होते. बाळं मोठे होताना बघायचे होते ... त्या दोघांची बाळं संगोपनाची तयारी जोरदार चालू झाली होती. पिल्लांसाठी चोचीत अगदी इलुसा इलुसा खाऊ (किडे, मकोडे) आणत होते दोघेही.. एका पायावरची तारेची कसरत नुसतं म्हणत नव्हती ती, तर चक्क खरं करून दाखवत होती. हळूहळू पिल्लांची वाढ छान होत होती, बाळसे धरायला लागले होते, भूक पण वाढली होती, तसे त्यांचे खाद्य पण वाढले.. आई बाबा आता जरा जास्त मोठा

खाऊ आणायला लागले होते. गांडूळ, छोट्या पाली, नाकतोडे इत्यादी... एव्हाना त्यांना म्हणजे आई बाबांना माझी सवय झाली होती. आई जरा घाबरायची, घाबरायची म्हणण्यापेक्षा एक पाय असल्यानं असावी कदाचित् ती फार धीर नव्हती करत. पण हा बाबा मात्र मला घाबरत नव्हता... एक दोनदा तर चक्क बोलला माझ्याशी.. मला प्रतिसाद देत होता चोच हलवून.. माझ्या नजरेला नजर देत होता आणि मी बोलल्यावर तो पण काहीतरी सांगत होता मला.. दयावंत दयाळ ने दया केली होती माझ्यावर... (कशी ती शेवटी सांगते)..माझा वेळ कसा उगवत होता कसा संपत होता काहीच कळत नव्हतं. दयाळ एके दयाळ बाळं. तीन बाळं असा माझा रोजचा कार्यक्रमच झाला होता.. इतकी गोंडस दिसायला लागली होती बाळं की असे वाटायचे हातात घेऊन गोंजारावं.. पण.. ती भलतीच लाजरी होती.. मी डोकावले की हळूच माना खाली करत होते.. हळूहळू आवाज फुटला, डोळे उघडून आई बाबांची वाट बघत बसायचे..१२ व्या दिवशी म्हणजे २९ जुलैला माझ्या नातवंडांचा नामकरण सोहळा धुमधडाक्यात साजरा केला मी. पण अगदी घरच्या घरी. फक्त माझी प्रत्यक्षदर्शी सखी माधवी, तसे प्रत्यक्षदर्शी नाही पण अगदी प्रत्यक्षदर्शीच होती, तिच्या उपस्थितीत.. चुन्नू मुन्नू गुन्नु अशी नावे ठेवण्यात आली. अन्नप्राशन सोहळा रोजच साजरा होत होता... पाळण्यातली बाळं कधी भरारी घेतात ह्याकडे डोळे लागले होते.. तो क्षण डोळ्यात साठवायचा होता. बाळांचा रंग पूर्णपणे बदलला होता, पंखांची वाढ झाली होती थोडी थोडी. बाहेर येऊन आईबाबांची खाऊसाठी वाट बघणे चालू असायचे.. एक बाळ जरा जास्त चंचल होतं, नीट बघितल्यावर कळलं ही मुलगी होती.. आम्ही मुली असतोच चंट.. हे विज्ञानाने पण सिद्ध केलं आहे नं! ह्यांची भरारी आणि माझी भरारी घ्यायची एकच वेळ नको येऊ दे अशी रोज प्रार्थना करत होते मी.. आणि बहुदा ती ऐकली त्यानं आणि थोडं आधीच आमच्या अपेक्षेपेक्षा दोन-तीन दिवस आधी म्हणजे २ ऑगस्टला दुपारी मी जरुरी कामासाठी बाहेर गेले असताना ह्यांनी भरारी घेतली... मन थोडं खट्टू झालं. रोजची किलकिली सकाळ शांत झाली होती रोजची गॅलरीतली माझी पावलं माघारी फिरली होती. सगळं शांत वाटत होते.. ती किलबिल तो चिचीवऽऽचीऽऽ... सगळं थांबलं होतं.. दुसऱ्या दिवशी जरा बाजूला जाऊन बघितलं तर तीनही बाळं मस्त बागडत होती. कडूलिंबाच्या झाडावर आणि बाजूला बाबा लक्ष ठेवून होता.. छोट्या छोट्या शेपटांनी टुणूक टुणूक उड्या मारत होते... पंखात बळ आले होते.. इकडे माझी सुद्धा भरारी घ्यायची वेळ अगदी आठ दिवसांवर येऊन ठेपली होती. पण ह्या पिल्लांच्या खोड्या, दंगामस्ती बघण्यात माझा वेळ कसा जायचा कळतच नव्हतं... ह्यांनी भरारी घेतल्यावर मात्र माझी तयारी सुरू झाली आणि अक्षरशः आठ दिवसांत मी ही माझ्या पिल्लाकडे जायची तयारी केली आणि आज हे लिहिताना मी माझ्या पिल्लाकडे भरारी घेते आहे.. पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय विमान प्रवास करत काही मिनिटात काही क्षणात मी हवेतून जमिनीवर येणार आहे...





*****

# एक महिना - गव्हाण घुबडाच्या पिलांच्या सहवासात...



**श्री युवराज पाटील**
जिल्हा समन्वयक,कोल्हापूर
9273064500

दिनांक २२/१२/२०२१, वार होता बुधवार, सकाळचे बारा वाजले होते. ''हॅलो, मी गंधर्व रिसॉर्टमधून बोलतोय, आमच्याकडे घुबडाची पिल्ले आहेत तेवढी इथून घेऊन जावा!! एकूण पाच पिल्ले आहेत.'' मी घरीच असल्याने तुमच्याकडे येऊन जातो असा मेसेज त्यांना दिला व मी तात्काळ तिकडे निघालो. साधारणपणे साडेबारा वाजता पोहोचलो. लॉकडाऊनचा काळ संपला होता. परंतु लॉकडाऊनचे नियम थोडेफार लागू होतेच. कोविड महामारी काळात जवळजवळ दोन ते अडीच वर्षे रिसॉर्ट बंद होते. रिसॉर्टच्या परिसरात गर्द हिरवी मोठाली वृक्षराजी होती. निलगिरी, आंबा, पळस, चेरी यांसह इतर शोभिवंत झाडे जास्त प्रमाणात होती. साधारणपणे दहा एकरमध्ये हे रिसॉर्ट वसलेले आहे. पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गावर टोप गावापासून एक किलोमीटर तर संभापूर गावापासून हाकेच्या अंतरावर हे रिसॉर्ट असावे. रिसॉर्टचे मालक श्री. गिरीश गुळवे सर यांचे विनंतीवरून व श्री. रजाक सर (रिसॉर्टचे प्रतिनिधी) यांचे माध्यमातून मी एकूण तीन घुबडांना रेस्क्यू केले. प्रथम मी तेथील सर्व उपस्थित रिसॉर्टच्या कर्मचारी व व्यवस्थापनाला घुबड पक्ष्याची ओळख करून दिली. त्याची खाद्यसवय, ते काय खातात, त्यांचा आढळ याविषयी संपूर्ण मार्गदर्शन केले.

मी तिथे पोहचलो तेव्हा एक पिलू कृत्रिम डॉल्फिन माशाच्या जबड्यात बसले होते. बहुतेक डॉल्फिन माशाच्या जबड्यातच घुबड पक्षाने घरटे केले असावे. कारण तिथे भरपूर विष्टांचा खच पडला होता. इतर दोन पिल्ले मोकळ्या स्विमिंग टॅन्कच्या आत बसली होती. आणखी दोन कृत्रिम घसरणीच्या काठावर बसली होती. हाताला नख्यांच्या मुळे जखम होऊ नये म्हणून मी एक जाड कॉटन कपडा घेतला व कपड्याच्या सहाय्याने मी स्विमिंग टॅन्कमधील ती दोन पिल्ले ताब्यात घेतली. त्यानंतर डॉल्फिन फिशच्या जबड्यातून एक पिल्लू बाहेर काढलं. तेथील पाचही पिल्लं बऱ्यापैकी पूर्ण वाढ झालेली होती. डॉल्फिन फिशच्या जबड्यातून पकडलेले पिलू मात्र थोडंस अशक्त व शांत वाटत होतं. स्विमिंग टॅन्कमधील दोन पिल्लं मात्र चांगलीच धडधाकट व आक्रमक होती. मी या तीन पिल्लांना एका बॉक्स मध्ये ठेवून माझ्या घरी घेऊन आलो. त्यांना त्यांच्या आई व वडिलांपासून विभक्त करणे थोडं मनाला न पटणारी गोष्ट होती. परंतु दोन वर्षांपासून बंद असलेले रिसॉर्ट पुन्हा सुरू करायचे होते. तेथील स्विमिंग टॅन्क, डॉल्फिन फिशच्या तोंडून पडणारे पाणी व इतर सर्व गोष्टी त्या ठिकाणी सुरू होणार होत्या. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांमुळे पिल्लांना त्रास होऊ नये म्हणून रिसॉर्ट व्यवस्थापन व मी स्वतः ठरवले की पिल्लांना इथून सुरक्षित ठिकाणी सोडून द्यायचे. परंतु त्या पिल्लांना काही दिवस घरी ठेवून त्यांचे पालनपोषण करणे जरुरीचे होते. कारण त्यांना शिकार कशी करायची हे प्रशिक्षण त्यांच्या आईवडिलांकडून मिळाले नसावे. म्हणून त्यांना मी घरीच काही दिवस खाद्य देऊन थोडी उडायला लागली की मग पुन्हा निसर्गाच्या सान्निध्यात सोडून द्यायचे.

त्यादिवशी मी त्यांना घरी आणले, येताना थोडे चिकन विकत आणले. घरीच एका कोंबड्या ठेवण्याच्या खुराड्यात सुरक्षित ठेवले. आमच्या घरी एक मांजर पाळलेले होते कदाचित ते घुबडाच्या पिलांवर हल्ला करेल म्हणून खुराड्यात सुरक्षित ठिकाणी ठेवण्याचे ठरवले. रेस्क्यू केल्यानंतर पुढे साधारणपणे एक महिना ही घुबडाची पिल्लं आमच्या बंगल्याच्या टेरेसवरच वास्तव्यास होती. मी दररोज सकाळ व सायंकाळी दोन वेळेस चिकनचे तुकडे खायला घालत असे. चिकन ते आवडीने खायचे. मात्र त्यातील एक अशक्त लहान पिलू लवकर खात नसे. चोचीत तुकडा तसाच धरून बसायचे किंवा खाली सोडून द्यायचे. फार तर जरा वेळाने एखादा तुकडा खायचे. इतर दोन पिल्लं मात्र चिकनवर चांगलाच ताव मारत होती. शिकारी पक्षी किंवा पाळीव मांजर त्यांच्यापर्यंत येऊ नये व त्यांना त्रास किंवा त्यांची शिकार करू नये म्हणून खुराड्यावर लाकडी पाट व त्यावर पोते झाकलेले होते. परंतु सहाव्या दिवशी सायंकाळी सात वाजता मी जेव्हा खुराड्याकडे गेलो तेव्हा तिन्ही पिल्लं खुराड्यातून बाहेर गच्चीवरील भिंतीवर येऊन बसलेली होती. याचा अर्थ असा असावा की आम्ही आता मोठे झालो आहोत व आता उडण्यासाठी सज्ज झालो आहोत असेच जणू त्यांना मला सांगायचे होते.

दुसऱ्या दिवशी मी सकाळी त्या तीनही पिल्लांना गच्चीवरच पाहिले. परंतु सायंकाळी पुन्हा सातच्या सुमारास मी एका पिल्लाला गच्चीवर न पाहता शंभर फूट अंतरावर आमच्या बंगल्याच्या समोरील शेजारच्या बंगल्यावर पाहिले तर बाकी दोन पिल्लांना आमच्या घराच्या मागे असणाऱ्या नारळीच्या उंच झाडावर बसलेले पाहिले. काही वेळाने बंगल्यावर बसलेले पिल्लू तिथून उडून त्या दोन पिल्लांच्या शेजारी बसले. अधून मधून ही पिल्लं वेगळा आवाज काढायची व पुन्हा शांत बसायची. यातील दोन पिल्लांनी नारळीच्या झाडाचा आधार घेतला होता. विशेष

म्हणजे या तीनही पिल्लांच्या सोबतीला त्यांचा आवाज ऐकून परिसरातील आणखी एक नवीन घुबड त्याठिकाणी निलगिरीच्या झाडावर सायंकाळी पाहावयास मिळाले. याचा अर्थ आमच्या गावात गव्हाण घुबडांचं अस्तित्व आहे हे ठळकपणे दिसून आले. दिवसा व रात्री ही दोन्ही पिल्ले त्या नारळीच्या झाडावर बसून रहायची. सकाळी सायंकाळी भूक लागली की ओरडायची. मग मी खायला प्लेटमधून चिकन व वाटीमधून पाणी आणले की काही सेकंदात झाडावरून खाली यायची व चिकन प्लेटवर झडप मारायची व क्षणाचाही विलंब न लावता प्लेट रिकामी करायची. मोठी होईल तसे त्यांची भूक चांगलीच वाढली होती. मी चिकनचा आहार वाढवला. अगोदर पावशेर चिकन आणायचो आता मात्र अर्धा ते पाऊण किलो चिकन आणत असे किंवा चिकन दुकानातील साठवलेले कोंबड्यांचे पाय व आतडी खायला आणत असे. पाय व आतडी यांचे तुकडे करून त्यांना भरवत असे. साधारणपणे मी एक महिना त्यांचा सांभाळ केला. तीनही पिल्लं हळूहळू मोठी झाली होती. त्यांच्या पंखात बळ आलं होतं. दिवसभर नारळीच्या झाडावर बसून रहायची व सायंकाळचे साडेसहा वाजले की चीर.. चीर.. असा एकसारखा आवाज काढायची व मी गच्चीवर कधी चिकन खायला घेऊन येतोय याची वाट पाहत बसलेली असायची. एके दिवशी तर खाद्य घेऊन गच्चीवर येताच माझ्या अंगावरच झडप घालायचे. चिकन प्लेट ठेवून बाजूला सरकतोय तोच पिल्लं त्या चिकन प्लेटमधील मोठाले तुकडे चोचीत घेऊन भिंतीवर बसून खायची. पोट भरले की रात्रभर शांत नारळीच्या झाडावर बसून रहायची. पिल्लांना आता चोचीत व पायांत पंज्याच्या सहाय्याने खाद्य पकडायची सवय लागली. याचा अर्थ ते आता नैसर्गिक अधिवासात स्वतःचे भक्ष्य स्वतः पकडू शकतील यात काही शंकाच नव्हती. गव्हाण घुबडाची पिल्लं रेस्क्यु केल्यानंतर एक महिना पुढे आमच्या बंगल्याच्या सभोवतालच्या शंभर फुटापर्यंतच्या गोलाकार भागात ती वास्तव्य करत होती. एक महिना ते सायंकाळी साडेसहाच्या दरम्यान चीर चीर असा आवाज करीत सर्व परिसर व तेथील येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष वेधून घेत असायची. येणारी प्रत्येक व्यक्ती व लहान मुलं वेगवेगळे प्रश्न विचारात असे, हे कोणते घुबड आहे. कुठे सापडले? काय खाते? नंतर त्याविषयी असणारी अंधश्रद्धा इत्यादी माहितीची देवाणघेवाण होत असे. एका महिन्यात गावात या घुबडाविषयी एक विशेष आकर्षण व कुतूहल निर्माण झाले होते. आमच्या गावातील बरीच वयस्कर व घुबडाची माहिती असणाऱ्या लोकांनी व शालेय लहानमोठ्या विद्यार्थ्यांनी माझ्या घरी भेटी दिल्या. अनेकांनी आम्ही असे घुबड कधी पाहिले नाही, पहिल्यांदाच पाहिले अशी उत्तरे दिली. काहीजण आपल्या गावात असली घुबडं या अगोदर नजरेस पडायची परंतु आता दिसत नाहीत असे सांगत होते. माझ्या शेजारील वयस्कर आजी, त्यांचे वय ८५ वर्ष असावे, त्यांना बोललेलं चांगलं कळत होतं. आम्ही त्यांना घुबड घरी आणलेलं नुसतं समजलं तरी त्यांनी दारातूनच हाक दिली की पहिले ते घुबड सोडून द्या. त्याचं तोंडसुद्धा बघू नका. त्यांना घुबडाविषयी फार अंधश्रद्धा व तिरस्कार होता. समाजात अजून घुबड पक्ष्याबद्दल बरीच अंधश्रद्धा व गैरसमज आहेत. घुबडाच्या जाती आपल्या परिसरात किती सापडतात व त्यांची ही नावे सर्व माहिती मी येणाऱ्या प्रत्येकाला सांगितली व घुबडाविषयी असलेल्या बऱ्याच अंधश्रद्धांविषयी अधिक जनजागृती केली. आमच्या गावात indian scoups owl, mottled wood owl, spotted owl, barn owl इत्यादी जातींची घुबडं व पिंगळा पक्षी यांचा आढळ आहे. एक महिन्याच्या कालावधीमध्ये माझी व आमच्या कुटुंबातील सर्व सदस्यांशी या घुबडांचे चांगले नाते जुळले होते. आम्ही त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला तरी पण ती तीनही पिल्लं आमच्या गच्चीवरून निघून गेली नाहीत. महिन्याच्या शेवटचे दोन-तीन दिवस त्यांना खाद्य देणे बंद केले होते. म्हटलं बघू उडून जातात का? परंतु ती आमच्या गच्चीवरून अजिबात निघून गेली नाहीत. त्यानंतर मात्र खाद्य ठेवणे पूर्णत: बंद केले. नंतर तिनही पिल्लं त्यांच्या हक्काच्या अधिवासात काय'ची निघून गेली. ती पुन्हा परत कधीच दिसली नाहीत.

*****



# निवळीचे तळे (उत्तरार्ध)



**माणिक पुरी**
निसर्ग लेखक,परभणी
9881967346

झाडांची पाने गळून पडावीत तसे बुरुजावरचे विचार गळून पडू लागले. पाण्यातील एका बाभळीवर सुगरणीची तीन घरटी झुलू लागली होती. त्यांच्या विणीचा हंगाम संपलेला होता. घरटी रिकामी झुलू लागली. बाळाचा रिकामा पाळणा हलवू नये असं म्हणतात. पण इथे वाऱ्याला कोण अडविणार?

तीन नदीसुरय पक्षी पाण्यावर भिरभिरत राहिले. त्यांच्या आवाजांना टवटवीतपणा आला होता.

मी डोळ्याला दुर्बीण लावून तळ्याकडं पाहू लागलो.

अडईचे दोन थवे पाण्यात उतरलेले. ते एकमेकात मिसळून पाण्याच्या आतील भागाकडं पोहत चाललेले. अचानक सगळ्यांनी पंख उघडले. हवेवर स्वार झाले. बुरुजाच्या दिशेनं निघूनही गेले. आमचे पाय आपोआप जिंतूरच्या दिशेनं वळाले.

(७)

चित्रदर्शी तळे सतत मला खुणावीत असे. तिथं माहेराला आलेली कितीतरी पाखरं भेटत. बाभळीचा गोतावळा पाण्यालगत एकवटलेला दिसे. त्या झाडांच्या आसऱ्यानं पाणपक्षी वास्तव्याला येत असत. काही दिवस तिथं आनंदानं राहत. पुन्हा आपल्या गावी निघून जात असत. अनेक पायवाटा तळ्यात विरून गेलेल्या दिसायच्या. पाणवनस्पतींची फुलं पाण्यावर डोकं काढून ऊन खात बसलेली दिसायची. टिटवीच्या आवाजानं पाण्यालगतचे पक्षी सावध व्हायचे. माजून गेलेल्या गवताच्या आसऱ्यानं पाणमोर वावरायचे. एखाद्या वाद्यावर आघात करावा तसा गवतातून टक् आवाज ऐकू यायचा. त्यानंतर वारकरी डोकावताना दिसे. अनेक झाडं काठालगत उभी राहून स्वतःचं प्रतिबिंब निरखून पाहण्यात हरवून गेलेली दिसायची. एखादी फांदी पाण्याला स्पर्श करीत असे. तेव्हा ते झाड जणू पाण्यावर बोटं फिरवीत असल्याचा भास होई. सकाळच्या वेळी लहान पाणकावळे बाभळीच्या फांदीवर बसून पंख सुकविताना दिसायचे. त्याच झाडाच्या गळफांदीवर सामान्य खंड्या शिकारीच्या तयारी दिसायचा.

नदीसुरय पक्ष्यांचा आवाज तळ्याभोवती सतत यायचा. मी त्या आवाजाचा अर्थ समजून घेण्यात बराच वेळ खर्ची घालायचो. पण कोडं काही उलगडायचं नाही. पक्षिशास्त्रज्ञ 'अर्नेस्ट सेटन' याने कावळ्यांच्या आवाजाचा अर्थ समजून सांगितला. इथं मला तर नदीसुरयचा आवाजच कळत नव्हता. तेव्हा समजावून सांगणं दूरच. जांभळ्या पाणकोंबड्या पाणकणीस गवतात स्वतःला लपवून घ्यायच्या. पांढऱ्याशुभ्र बगळ्यांचा एक थवा तळ्यावरून कुडा गावाच्या दिशेनं निघून गेला. तेव्हा सूर्य पश्चिमेकडं सरकत होता. कवड्या धीवर पंख फडफड करीत पाण्यावर स्थिर होऊ पाहत होता. तेवढ्यात त्यानं पाण्यात बुडी घेतली. वर येऊन बाभळीच्या फांदीवर बसला. तेव्हा त्याच्या चोचीत मासा दिसला होता.

राखी कोहकाळ गुडघाभर पाण्यात उभा दिसायचा. आम्हाला पाहून पलीकडील बाजूस जायचा. आम्ही लपणात बसलो की पुन्हा पूर्वीच्या जागी दिसायचा. पाण्यालगत पक्ष्यांच्या पायांच्या खाणाखुणा आढळून येत. त्यात कितीतरी विविधता दिसून येई. बदकांच्या पायांची नक्षी पाहून नवल वाटतं. मध्येच गवताचं बेट यायचं तेव्हा ती रांग खंडित व्हायची. या भिरभिरणाऱ्या पाखरांच्या पायांची रेखांकित नक्षी नोंदवहीत उमटायची.

(८)

सकाळचे आठ वाजलेले. काल जिथं अडईच्या थव्यानं आम्हाला चकवा दिला होता त्या ठिकाणी पोहोचलो. तो थवा बुरजाच्या दिशेनं निघून गेल्याचं पाहिलं होतं. आम्ही दोघे कुडा गावाच्या दिशेनं हळूवार चालू लागलो. तळ्याचं पाणी पसरट दिसू लागलं. त्यापुढं तळ्यानं हात-पाय आखडून घेतलेले. जिथं पाणी कमी झालेलं तिथं गवतानं डोकं वर काढलेलं. त्याच्या पलीकडं हिरवळ दाटलेली. जणू बगीच्यामधील गालिचाच!

त्या हिरवळीवर सहा चक्रवाक पक्ष्याने आसरा घेतलेला. अनिल बाभळीच्या झाडाखाली बसून 'ई-बर्ड' च्या वेबसाईटवर नोंदी करत होता. मी झाडाचा आधार घेत दुर्बिणीतून चक्रवाक पक्ष्यांचे निरीक्षण करू लागलो. तीन चक्रवाक समोरासमोर जणू बोलताहेत असंच वाटायचं. शेजारील दोघांनी एकमेकांकडे पाठ फिरवलेली. जणू दोन भांडखोर शेजारीच! एक चक्रवाक त्यांच्यापासून काहीसा दूर उभा होता. २० मिनिटे झाली तरीसुद्धा ही पाखरं कोवळ्या उन्हात उभी होती. तेवढ्यात आमच्यासमोर दोन पठाणी होले पाणी पिण्यासाठी खाली उतरले. दोघांनीही सभोवतालचा कानोसा घेतला. पाण्यात चोच बुडविली. पोटभर पाणी प्यायले. त्यांच्या शेजारी एक 'लालपंखी चंडोल' उतरला. पण त्याने पाणी घेतलं नाही. पुन्हा तो काठालगत येऊन

बसला. तिथं त्याचा जोडीदार वाट पाहत बसलेला होता. काही वेळानं दोघेही भुर्रकन उडून गेले.

उजव्या बाजूनं चार माळटिटव्या अवतरल्या. अचानक कुठून आल्या कळालच नाही म्हणून त्या अवतरल्या असं म्हणालो. त्यांच्या आवाजानं पाखरं सावध झाली. दोन माळटिटव्या दगडाजवळ रेंगाळल्या. पण दोन माळटिटव्या चक्रवाकाजवळ पोहोचल्या तरीसुद्धा त्यांच्यात ठराविक अंतर होतंच! पण चक्रवाक पक्ष्यांनी हालचाल करायला सुरुवात केली.

एकानं पंखाची उघडझाप केली. लहान आकाराची पिसे गळून पडल्याचं पाहिलं. हे सगळं दुर्बिणीतून दिसत होतं. दुर्बिणीचा पुरेपूर उपयोग आम्ही करत होतो.

आम्ही आणखी पुढं सरकलो. चक्रवाक पक्ष्यातील काहीसं अंतर कमी केल्याचं समाधान वाटत होतं. पण तो आनंद फारच कमी वेळ टिकला. आम्ही बसण्याची जागा निवडली तेवढ्यात चक्रवाक पाण्यात उतरले. हिरवळीवर जाऊन चक्रवाक पक्ष्यांची गळून पडलेली पिसे नोंदीसाठी जमा केली. नारंगी रंगाची ती पिसे बाभळी खालीच ठेवली. तिथंच विसरली. खरं तर ती पिसे काही काळ जपून ठेवायची होती.

चक्रवाक पाणपक्ष्याला 'ब्राह्मणी बदक' असं म्हटलं जातं. एका ठिकाणी चक्रवाकसाठी 'चकवा' हे नाव वाचण्यात आलं. हे नाव वाचल्यावर माझं मलाच हसू आलं. सुरुवातीला मी अडईच्या थव्यानं चकवा दिला असं म्हणालो. आता इथं चक्रवाक या नावाचा कुणी चकवा पक्षी आहे हे सांगतोय. एकाच पक्ष्याच्या नावातील गंमतीजमती अभ्यासल्यावर त्यातील बारीकशा नोंदी कळू लागतात.

चक्रवाक एकटे-एकटे फिरताना दिसून येत नाहीत. जोडीनं किंवा थव्यानं वावरतात. त्यांना थोडी जरी कुणकुण लागली की, लगेच जागा बदलतात. सुरक्षित ठिकाणी पोहोचतात. आम्ही थोडसं अंतर काय कमी केलं त्यांनी लगेच पाण्यात उतरायची घाई केली.

हवं तर आपण यांना भित्रे पक्षी म्हणूया. माणसांची सावलीसुद्धा पडू देत नाहीत. तसा माणसाचा काय भरवसा? पाणपक्ष्यांचा तळ्यावर जसा विशास असतो तसा माणसावर नसतो हेच सत्य!

चक्रवाक पोहत-पोहत खोल पाण्याकडं जाऊ लागले. दूरवर जाऊन स्थिरावले. हे पक्षी हिवाळ्यातच निवळीच्या तलावात दिसून येतात. राजहंस पक्ष्यांसारखंच या पक्ष्यांनाही स्थलांतरित पक्षी म्हणून आम्ही नोंदवहीत टिपलं होतं.

दोन माणसं पाण्यात उतरली. होडीनं तळ्याच्या आतील भागाकडं जाताना दिसले. ते मासे पकडणारे भोई होते. त्यांच्यामुळे सहा चक्रवाक पक्ष्यानं तेथून पळ काढला. ते मापा गावाच्या दिशेनं निघून गेले.

ज्या दिशेनं माळटिटव्या अवतरल्या त्या दिशेनं आम्ही वळालो. तिकडं फार जुनी एक विहीर दिसली. शेजारी पिपरणी वाढत चाललेली. बुरुजावरची माणसं आणि ही विहीर यांचं नातं तसं जुनंच असावं करपरा नदी पावसाळ्यात दूषित होत असावी तेव्हा या विहिरीनच गढीला पाणी पुरविलं असणार. बुरुजावर खेळणारी लेकरं या विहिरीजवळ बसून आंघोळ करत असतील.. गेले ते दिवस राहिल्या त्या आठवणी वाटेवरच्या पाऊलखुणा गेल्या सांगूनी असं म्हणतच आम्ही सोबत आणलेल्या भाकरी हातावर घेतल्या. भाकरी खाल्ल्या. हातावर पाणी घेतलं. पिपरणी खाली थोडा वेळ आराम केला. त्यावेळी 'नागझिरा' पुस्तकातील कांचन मृगाची शिकार आठवली. पुस्तकातील झाड पिपरणी नव्हतं. पण तसे विचार डोक्यात सुरू झाले. माझे डोळे पिपरणीच्या खोडावर भिरभिरू लागले. अजून काही विचार येण्याअगोदर आम्ही पाण्यालगतच्या पाणकणीस गवताच्या आडोशानं पाण्यावर आलेल्या काळविटांच्या पाडसाला पाहू लागलो.

(९)

दुपारची वेळ. आम्ही डोक्यावर हॅट घातलेल्या. तळ्याच्या पलीकडील काठ फार दूर नव्हता. कुडा गावाच्या बाजूनं तळं निमूळतं होत आलेलं. त्यापुढं गावाकडून येणारा ओढा दिसतो. सध्या तो वाळूनं भरलेला दिसू लागला. या ओढ्यालगत हमखास शेळ्या चरताना दिसत. एका दिवशी त्या शेळ्यांची मोजदाद केली. तेव्हा त्या १७ होत्या. आम्ही पाणकणीस गवतात लपून बसलेलो. पुढ्यात हळदी-कुंकू बदकाच्या आठ जोड्या दिसल्या. त्यातील नर-मादी ओळखता आले नाहीत. एकूण १६ बदकांच्या हालचाली दिसू लागल्या. हळदी कुंकू आमच्या समीप आले होते. उघड्या डोळ्यांनी त्यांना सहज पाहता येत होतं. या बदकाला हळदी-कुंकू नाव कसं मिळावं याविषयी त्यांचं निरीक्षण केलं. पिवळे टोक असलेली चोच आणि कपाळावर तांबड्या रंगाचा ठिपका पाहून याची कल्पना येते. डोळे काळेभोर. भुवई काळसर रंगाची. अंगावर खवलेधारी पिसे. पंखाच्या मागील बाजूस हिरवी पिसे. हवेत उडताना तो हिरवा रंग अधिक उठून दिसायचा. त्यातील एक बदक गवतावर आले. तेव्हा त्याचे तांबड्या रंगाचे पाय जवळून पाहता आले. अजून आमचा त्यांना सुगावा लागला नव्हता. म्हणून ते धीटपणे पाणवनस्पतीवर ताव मारत होते. पक्षिनिरीक्षण करताना संयमाची फार गरज असते ते इथं अनुभवायला मिळाले. बाहेर आलेल्या बदकाने पुन्हा पाण्यात उडी घेतली. या तळ्यात त्यांना राहण्यासाठीची जागा उत्तम होती. खाद्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. धोक्याची शक्यता फारच

कमी म्हणून बदकाच्या विविध जाती इथं गुण्यागोविंदानं मुक्तपणे वावरताना दिसू लागल्या.

हळदी कुंकू बदक पाण्याच्या दिशेनं सरकले. थोड्या अंतरावर चक्रांग बदकाची एक जोडी पोहताना दिसली. त्याच दिशेनं या बदकांनी मोर्चा वळविला. पलीकडच्या काठावर काळविटांचा कळप एकवटलेला दिसला. हरभऱ्याचं रान तुडवीत त्यांनी पाण्याच्या दिशेनं चालायला सुरुवात केली. काळवीट नर उंचावट्यावर उभा होता. माद्यांनी पाण्याला तोंड लावले. त्यातील पाडसावर दुर्बीण स्थिरावली. ४

पाणपक्ष्यांची निरीक्षणे करताना पाण्यावर आलेल्या प्राण्यांच्या नोंदी सुद्धा घेऊ लागलो. पक्ष्यांचं आणि या प्राण्यांचं सहजीवन समजून घेऊ लागलो. पाडसानं पाण्याला तोंड लावलं. त्याच्या आईसारखं कावरंबावरं होऊन पाहत नव्हतं. त्याला अजून धोक्याची जाणीव नव्हती. ते अजून तरी बिकट प्रसंगाला सामोरं गेलं नव्हतं. त्याच्या कळपानं त्याला सुरक्षित ठेवलेलं. जस-जसं पाडस मोठं होईल तस-तशी संकटाची मालिका त्याला कळू लागेल. तेव्हा ते कानोसा घेऊनच पुढचं पाऊल उचलेल. त्याचे कान रात्रीच्या वेळी डोळे म्हणून काम करतील. तूर्तास त्या पाडसानं पोटभरून पाणी घेतलं. त्यानंतर पाणकणीस गवताच्या बाजूला असलेल्या हिरवळीवर हुंदडलं.

काळविटाचा कळप पाण्यावर आला तेव्हा त्यांनी बराच वेळ घेतला. सगळ्यांनी मनसोक्त पाणी पिऊन घेतलं. बाजूला हुंदडत राहिले. तेव्हा बाभळीवर बसलेल्या ढोकरी पाण्याकडं सरकल्या. काळविटानं स्वतःच्या अस्तित्वाच्या काही खाणाखुणा तिथंच सोडल्या. त्यानं बाभळीच्या खोडाला अंग घासलं. काही वेळानं कळप आलेल्या वाटेनं परत गेला. जिथं काळविटांनी पाणी प्यायला तिथं आता पाच-सहा जांभळ्या पाणकोंबड्या वावरू लागल्या.

*****

## आपल्या माहितीला उजाळा : भाग ९

| क्र. | प्रश्न | थोडी मदत |
|---|---|---|
| १. | Greater Flamingo चे मराठी नाव काय? | याचे शास्त्रीय नाव Phoenicopterus roseus |
| २. | गटात न बसणारा खंड ओळखा.<br>ऑस्ट्रेलिया आफ्रिका<br>आशिया दक्षिण अमेरिका | नैसर्गिकरीत्या या भूखंडावर रोहित पक्षी आढळत नाहीत. |
| ३. | जगात रोहित पक्ष्यांच्या एकूण किती प्रजाती आहेत? | क्रिकेट मधील एका षटकातील एकूण चेंडूची संख्या. |
| ४. | फ्लेमिंगो हे नियतकालिक कोणत्या संस्थेकडून प्रकाशित होते? | हे गुजरात राज्यातून प्रकाशित होते. |
| ५. | सात दशलक्ष वर्षापूर्वी रोहित पक्षी उत्क्रांत झाले असल्याचा पुरावा देणारे जीवाश्म कोठे सापडले? | हे ठिकाण दक्षिण अमेरिकेत आहे. |
| ६. | मोठा रोहित पक्षी कोणत्या राज्याचा राज्यपक्षी आहे? | हे राज्य आशिया सिंहासाठी लोकप्रिय आहे. |
| ७. | रोहित पक्ष्याची ही प्रजाती संकटग्रस्त आहे. | ही प्रजाती दक्षिण अमेरिकेच्या डोंगर रांगामध्येच आढळते. |
| ८. | जागतिक फ्लेमिंगो दिन केव्हा साजरा केला जातो? | पक्षितज्ज्ञ जॉन जेम्स ऑडोबॉन यांच्या जन्म दिनी. |
| ९. | जगभरातल्या रोहित प्रजातीविषयी इत्थंभूत माहिती देणारा ग्रंथ "Flamingos' चे लेखक कोण? | हे पुस्तक २०१७ साली प्रकाशित झाले. |
| १०. | चित्रातील पक्षीशास्त्रज्ञ ओळखा.  | हे IUCN मध्ये रोहितपक्षी गटाचे मुख्य कार्यकारी आहेत. |

# महाराष्ट्र पक्षिमित्र व्याख्यानमाला



**डॉ चेतना उगले**
व्याख्यानमालिका समन्वयक

महाराष्ट्रात मागील चाळीस वर्षाहून अधिक काळ पक्ष्यांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी अविरत कार्य करणाऱ्या महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेकडून दरवर्षी पक्षी संरक्षण आणि संवर्धनासाठी विविध उपक्रम घेतल्या जातात. पक्षी विषयक व्याख्यानांचे वेबिनार हा त्यातीलच एक उपक्रम. सभासद आणि पक्षीमित्रांशी प्रत्यक्ष भेट, संमेलने आणि पक्षी विषयक व्याख्याने याद्वारे जनजागृती आणि संवाद करण्याऱ्या आपल्या संघटनेला कोविड जागतिक महामारीमध्ये सभासद आणि पक्षीमित्रांशी संवाद साधायला तंत्रज्ञान आणि इंटरनेट हे माध्यम दुवा ठरले. २०२० मध्ये सुरु झालेले पक्षी विषयक व्याख्यानांचे ऑनलाईन सादरीकरण हळूहळू महाराष्ट्र पक्षीमित्रच्या वार्षिक उपक्रमाचा भाग होत आहे. दर्जेदार आणि माहितीपूर्ण सादरीकरणामुळे पहिल्या दोन मालिकेतून सादर झालेली पक्षी विषयक व्याख्याने नेहमीच चर्चेत राहिली. पक्षीमित्रांचा उत्स्फुर्त प्रतिसाद आणि अनेक सभासदांचा आग्रह यामुळे एप्रिल २०२३ मध्ये पक्षी विषयक व्याख्यानमालिका पुन्हा सुरु करण्यात आली. साधारण एप्रिल शेवट मला माननीय अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांचा फोन आला आणि सदर व्याख्यानमालिका आपण याच महिन्यात सुरु करतोय आणि सुरवात तुमच्या व्याख्यानाने होईल अशी माहिती दिली. एवढा मोठा व्यासपीठ आपल्याला मिळेल याचा मनापासून आनंद झाला. पण त्याची अगदी तीन दिवसानंतरचीच तारीख होती. सर्व सभासद आणि पक्षीमित्रांना सोईचे जावे या उद्देशाने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या बुधवारला ऑनलाईन पद्धतीने व्याख्याने होईल असे ठरले होते. विषयाची निवड माझ्यावर सोपवल्या कारणाने थोडा दिलासा होता. चंद्रपूर मध्ये नुकत्याच झालेल्या पक्षीमित्र संमेलनामध्ये मी पॅच मॉनिटरिंग वर केलेल्या माझा अभ्यास मांडला होता. त्यावेळी पॅच मॉनिटरिंग प्रोटोकॉल बद्दल बऱ्याच शंका आणि प्रश्न विचारल्या गेले. पॅच मॉनिटरिंग हा पक्षांचा पद्धतशीर अभ्यास आहे आणि तो अभ्यास एका ठराविक पद्धतीने करावा लागतो. त्या प्रोटोकॉल चे सविस्तर वर्णन आणि पद्धती या सर्व प्रमुख विषयांना मी व्याख्यानासाठी निवडले आणि एप्रिलच्या चौथ्या बुधवार पासून पक्षी विषयक व्याख्यान मालिकेला सुरवात झाली.

मे महिन्यातील दुसऱ्या बुधवारला,अमरावती मधील पक्षी अभ्यासक श्री. किरण मोरे यांचे व्याख्यान झाले.अमरावती एमआयडीसी परिसरातील पाणथळ पक्षांवर होणारा प्रभाव या विषयावर झाला. पक्षी अभ्यासक श्री.किरण मोरे यांचे सादरीकरण सुव्यवस्थित आणि माहितीपूर्ण आणि संशोधन पूर्वक होते. श्री. मोरे यांनी पाणथळीच्या पक्ष्यांवर आणि त्यांच्या निवासस्थानावर वाढत्या औद्योगिक विकासाचा होणारा परिणाम याविषयी विस्तृत माहिती दिली. व्हिज्युअल्स अँड मल्टिमीडियाच्या वापरामुळे सर्व पक्षीमित्रांना संपूर्ण सादरीकरणाचा उद्देश स्पष्ट झाला आणि संवर्धनाच्या प्रयत्नांसाठी काय करता येईल याची दिशा भेटली. श्री. मोरे यांचे सादरीकरण माहितीपूर्ण आणि अमरावती शहरातील पक्ष्यांच्या विविधतेबद्दल आणि त्यांच्या संवर्धनाबद्दल महत्त्व समजून सांगणारे होते. याच महिण्यातील दुसरे व्याख्यान, भंडारा जिल्ह्यातील युवा पक्षीसंशोधन विद्यार्थिनी कु. मृणाली राऊत हिने दिले. पक्षीनिरीक्षण हा केवळ छंद नसून विज्ञान आणि संवर्धनासाठी कसे योगदान देतो यावर एक संक्षिप्त परंतु माहितीपूर्ण सादरीकरण झाले. पक्षीनिरीक्षक म्हणून आपल्याकडून ई-बर्ड सारख्या सिटीझन सायन्स पोर्टलवर संपादित करण्यात येणारी माहिती हि संशोधनात कशी उपयोगी येते, अचूक डेटा संकलनाचा पक्षीअभ्यासावर कसा प्रभाव होतो याचे सचित्रित आकर्षक सादरीकरण केले.

जुन महिन्यात सुरु झालेल्या विणीच्या हंगामासोबतच पक्षांची गाणी पण सुरु होतात. आणि अश्याच गाणी, पक्ष्यांच्या आवाजांचे जाणकार पक्षीतज्ज्ञ श्री. शरद आपटे यांच्या व्याख्यानाचे आयोजन जून मध्ये घेण्याचे ठरले. स्केल्स टू सिंगिंग फेदर्स या विषयवार पक्षीतज्ज्ञ श्री. शरद आपटे यांनी पक्ष्यांच्या पिसांचा एक ज्ञानवर्धक शोध मांडला. त्यांचा पक्षांच्या पिसांवरचा सखोल अभ्यास आणि वैज्ञानिकदृष्ट्या माहितीपूर्ण सादरीकरण यामुळे पिसांबद्दल सखोल माहिती सभासद आणि पक्षीमित्रांना मिळाली. पिसांची रचना, प्रकार, कार्ये आणि महत्त्व यावरील सादरीकरण आणि पिसांचा होणार आवाज प्रत्यक्ष थेट ऐकण्याचा अनुभव सर्व पक्षी मित्रांना अनुभवता आला.

विणीच्या हंगामा अखेरीस घरटी बांधायची कामे पूर्ण झालेली किंवा चालू असतात आणि जेव्हा घरट्यांचा उल्लेख होतो तेव्हा सर्वात पहिले आठवण होते ती सुगरण पक्षाच्या खोप्याची. याच सुगरण पक्षाच्या विशिष्ट वर्तनाची माहिती बाँबे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे सहाय्यक संचालक डॉ. राजू कसंबे यांनी त्यांच्या व्याख्यानमालिकेत

दिली. सुगरणीच्या बहूपत्नीत्वाची गोष्ट या व्याख्यानामध्ये सुगरण पक्ष्यांचा बहुपत्नीत्वाचा आकर्षक शोध होता. सादरीकरण विस्तृत संशोधन दाखवणारे होते. डॉ. कसंबे यांनी सुगरण पक्ष्यांच्या वर्तनातील गुंतागुंत सोप्या शब्दांमध्ये मांडल्यामुळे पक्षीमित्रांना समजण्यास सोपी गेले. वेबिनारचा समारोप संवर्धनाच्या संदेशाने झाला.

महाराष्ट्रातील उत्कृष्ट पक्षी अभ्यासक आपले सादरीकरण देतच होते पण त्याच दरम्यान पक्षीमित्रांपर्यंत आणखी नवीन विषय आणण्याचा आमचा प्रयत्न चालू होता. स्थानिक, राज्यातील एवढेच नाहीतर इतर राज्यातील राष्ट्रीय स्तरावर कार्य करणारे उत्तोमोत्तम वक्ते यांच्याशी संपर्क सुरु झाला. आणि मग वेबिनार सिरीज मराठी भाषेपर्यंत मर्यादित राहिली नाही. भाषा फक्त एक माध्यम आहे पण खरा प्रयत्न उत्तोमत्तम आणि संशोधक वक्त्यांचे नवनवे शोध, संशोधन आणि नवीन तंत्रज्ञान अश्या विषयांना पक्षीमित्रांसमोर आणणे असा होता. आणि मग जुलै मध्ये हिंदी मध्ये अभ्यासू आणि संशोधक कु. ईशा मुन्शी यांनी सादरीकर केले. एनसीबीएस बंगलोर मध्ये क्युरेटर म्हणून काम करणाऱ्या ईशा मुन्शी या फेदर लायब्ररीच्या संस्थापक आहे. त्यांनी फेदर लायब्ररी वर विसृत माहिती दिली. पक्षांची पंखे, त्यांची अवशेष इथपासून ते त्यांच्या पिसांची लांबी, प्रकार आणि त्यावरून पक्षांची ओळख. अश्या कित्येक पक्ष्यांच्या पंख आणि पिसांचा संग्रह त्यांच्या फेदर लायब्ररी मध्ये आहे. प्रत्यक्ष पक्ष्यांच्या पंखांची रचना बघणे हे पक्षीमित्रांना पर्वणी होती असेच म्हणावे लागेल.

त्यानंतर ऑगस्ट महिन्यातील व्याख्यानमालिकेत दुष्काळी भागातील पक्ष्यांच्या विविधतेवर आणि त्यांच्या संख्येवरचा बदल माजी मानद वन्यजीव रक्षक, सोलापूर डॉ. निनाद शाह यांनी मांडला. प्राणीशास्त्र विभाग प्रमुख आणि प्राचार्य म्हणून निवृत झालेले प्रा. डॉ. निनाद शाह यांनी अवर्षण प्रवण भागातील पक्षी विविधता- ऱ्हासाच्या कारणांचाही परामर्श अंतर्भूत या व्याख्यानांमध्ये दुष्काळी भागातील पक्षांना भेडसावणार्या आव्हानांविषयी मौल्यवान माहिती दिली. अशा प्रदेशात पक्ष्यांच्या ऱ्हासामागील कारणांवर प्रभावीपणे प्रकाश टाकला. डॉ. शाह यांच्या आकर्षक शैलीमुळे विषय समजायला सोपी झाला आणि त्यांनी संवर्धनाच्या प्रयत्नांची गरज यावर भर दिला. पुढे याच महिन्यातील चौथ्या बुधवारला डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांच्या व्याख्यानामध्ये बरडगावातील चित्रबलाकाचा आकर्षक शोध मांडण्यात आला. मानद वन्यजीव रक्षक आणि प्राणिशास्त्र प्राध्यापक असलेल्या डॉ. कुऱ्हाडे यांनी अत्यंत सखोल संशोधनाद्वारे परिपूर्ण सादरीकरणात चित्रबलाक या पक्ष्यांच्या संवर्धनाचे महत्त्व सांगून पक्षीमित्रांना संवादाला प्रोत्साहन दिले. व्याख्यानाचा समारोप परिसरातील हेरॉनरी यांच्या संवर्धनासाठी कृतीयोग्य योजना देऊन झाला.

२५ ऑगस्ट २०२३ ला नॅशनल कन्झर्वेशन फाउंडेशनने (एनसीएफ) प्रसिद्ध केलेल्या स्टेट ऑफ इंडियाज बर्ड रिपोर्ट पक्षीमित्रांमध्ये चांगलाच चर्चेचा विषय होता. त्याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी खुद्द त्या रिपोर्ट तयार करण्यामध्ये सहभागी असलेल्या संशोधकला व्याख्यानासाठी आमंत्रित करण्याचा निर्णय झाला. एनसीएफ मध्ये सहाय्यक संशोधक असलेले डॉ. अश्विन विश्वनाथन यांचे व्याख्यान सप्टेंबर महिन्यातील दुसऱ्या बुधवारला नक्की झाले. डॉ. अश्विन विश्वनाथन यांनी स्टेट ऑफ इंडियाज बर्ड - महाराष्ट्राचा दृष्टीकोन या व्याख्यानात रिपोर्ट मध्ये प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्रातील पक्षांच्या विविधतेचा व्यापक आढावा दिला. डॉ. विश्वनाथन यांनी प्रत्यक्ष स्टेट ऑफ इंडियाज बर्ड रिपोर्टच्या वेबसाईटचे थेट प्रक्षेपण दाखवून या रिपोर्टचे परिणाम संशोधनासाठी आणि संवर्धनासाठी कसे उपयोगी ठरेल याविषयी माहिती दिली. महाराष्ट्रातील पक्षी संवर्धनाची आव्हाने मांडणारे माहितीपूर्ण आणि विचार करायला लावणारे सत्र होते. त्यानंतर चौथ्या बुधवारला आपल्या पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर सर यांचे व्याख्यान ठरले. याचवर्षी सुरु झालेल्या कला आणि सांस्कृतिक वारसा राष्ट्रीय ट्रस्ट (इनटॅक) अमरावती चॅप्टर चे संयोजक म्हणून डॉ. वडतकर कार्य सांभाळत आहे. त्यांनी आपल्या व्याख्यानामध्ये प्राचीन मंदिरांवरील पक्ष्यांच्या कोरीव कामाचा एक आकर्षक प्रवास मांडला. पक्षांच्या जगाचे ऐतिहासिक, कलात्मक आणि सांस्कृतिक वारसा दाखवणारे माहितीपूर्ण सादरीकरण होते. प्राचीन मंदिराकडे बघण्याची आणि त्याच्यावर पक्षांचा शोध घेण्याची एक नवीन दृष्टी पक्षीमित्रांना मिळाली. भारतीय कला आणि संस्कृतीच्या या कमी ज्ञात पैलूबद्दल डॉ. वडतकरांची आवड आणि कौशल्य दिसून येते.

व्याख्यानमालिकेची माहिती चिरकाल संग्रही राहावी या उद्देशाने सदर आणि याआधी झालेल्या व्याख्यानमालिकेचे सर्व व्याख्याने व्हिडिओ रूपात महा पक्षीमित्र नावाने युट्युब चॅनेल वर उपलब्ध आहे. या ऑनलाईन व्याख्यानमालिकेला महाराष्ट्र पक्षीमित्र अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांचे सतत मार्गदर्शन आणि सहकार्य मिळत आहे. प्रत्यक्ष व्याख्याने संचालित करण्यात मी जेवढी नजरेस दिसत आहे तेवढेच काम पडद्यामागे श्री. किरण मोरे करत आहे. त्यांच्या कलात्मक दृष्टीतून व्याख्यानाचे माहितीपत्रक, युट्यूबचे शीर्षकचित्र अधिक प्रभावी होत आहे. व्याख्यानमालिकेला मिळणारा सभासदांचा आणि पक्षीमित्रांचा उत्स्फुर्त प्रतिसाद नवीन विषय आणि संशोधनात्मक चर्चा पुढे आणण्यासाठी आमचा उत्साह वाढविणारा आहे, त्याबद्दल आभार.

# Pipit in the Dark Night



**राघवेंद्र वंजारी**
सोलापूर
9028769182

Me & my younger brother, Rahul, we were birding in the out skirts of Solapur. which is a famous spot for grassland lovers, photographers, and researchers. It was a windy evening in mid-June of 2022. We had just spotted a busy pair of Paddyfield Pipits (Anthus rufulus), buff coloured, spotted chest, pinkish leg and with a prominent yellow supercilium. They were preoccupied with feeding their young ones. Their nest was camouflaged to the extent that it was difficult to locate them even with our binoculars. We could not find the entrance till we actually saw them entering or leaving the nest. It was so well hidden among the grass rushes, almost invisible in the yellow carpeting of grass. The unceasing hunger of three chicks takes up a tremendous amount of parental energy. It isn't enough to pass your genes to next generation, you must feed and protest the hatchlings constantly. The threats were all around, as thick as the surrounding grass; and to find a way took tremendous courage and intelligence. As the parent bird approached the nest, a grasshopper or grub in its beak, the chicks set up a loud and attractive welcoming chirp... chirp... chirp..., eager for their share. One forage per beneficiary at a time – that was the rule. And so ended a memorable day, Rahul and I returning to our home, just as the pipits returned to theirs. That night came the rain, heavy and thundering. We were worried about our Pipit family. What would happen to the grounded nest and the young chicks it held? Next morning, we returned to the same site, as anxious as we were curious. The picture had completely changed. The tall grass was wet, the trail was muddy, and half the meadow, submerged. Water ran everywhere – the Pipit nest had been flooded. We spotted a lone parent in the vicinity, a motionless chick, still stuck among the reeds, even as a second chick struggled to breath in the water, desperate for a solid place to keep dry and alive. There was no sign of the third. Everything had changed overnight. The lush grassland lay silent. What had the Pipit parents done to save their chicks? Was there anyway they could have protected the nest in the heavy rain? Some way for them to escape? The night had been long and dark for the Pipit family. All the odds had been stacked against them.

Every season has its own joys and tragedies. The rains nourish the seeds, that feed the birds, that care for their chicks and bring new life. But the rains can also take lives without mercy. In the life of a bird, there are crests and troughs. But the joy of simply watching birds remains.



# हॉर्नबिल

## जागतिक हॉर्नबिल परिषद, बँकॉक




**किरण मोरे**

सहाय्यक संपादक, पक्षिमित्र अंक

9923910034


एका जंगलाच्या दिशेने आठ-दहा जणांची टीम मार्गक्रमण करीत असते. त्यात अवजड सामान घेतलेले काही मजूर व शेफ आहेत. त्या शेफच्या अंगावर कंपनीचा पांढरा ड्रेस कोड असतो. जंगलातल्या घनदाट ठिकाणी त्यांचा तंबू उभारला जातो. तिथे थायलंडचा प्रसिद्ध असलेला मास्टर शेफ पॉल हजर असतो. ज्याच्या हातचा पदार्थ खायला श्रीमंत लोक लाखो रुपये मोजायलाही तयार असतात. आता शेफ पॉलच्या मार्गदर्शनात एक स्पेशल डिश बनविण्याची तयारी चालू आहे. सर्व सहकारी तंतोतंत त्याच्या सूचनांचे पालन करीत असतात. त्यावरून त्याचा दरारा दिसून येतो. लावलेल्या तंबूमधून दोन मध्यमवयीन माणसे निघतात. श्रीमंती व मग्रुरी दोन्हींचे मिश्रण त्यांच्या चेहऱ्यावर झळकत असते. त्यांचा अंगावरील ड्रेस शिकाऱ्याला शोभेल असा व हातात बंदूक आहे. शेफ पॉल लगेच आपल्या शिकाऊ तीन सहकाऱ्यांना चाकू आणि भांडे घेऊन त्यांच्यासोबत पाठवतो. त्यात शेफ असलेली ओये नावाची तरुणी व तिचा मित्र असतो. शिकाऱ्यासारखे भासणारे दोघे समोर व हे तिघे मागे असे जंगलाच्या पाउलवाटेने निघतात. काही अंतर चालल्यावर एकजण बंदूक वर करून एका उंच झाडाच्या टोकाशी नेम धरतो. मागील तिघे शेफ जागीच थबकतात. ओये आपला श्वास रोखून वर पाहते. काही वेळाने बंदुकीतून बार उडतो आणि झाडावरून काहीतरी खाली पडल्याचा आवाज येतो. पाठोपाठ त्या तिघांपैकी एक जण जाऊन केलेली शिकार घेऊन येतो. येतांना त्याच्या हातात तीन फुटाचा मोठा रंगीत पक्षी असतो. चाकूने त्या पक्ष्याचा गळा कापून रक्त स्टीलच्या भांड्यात ओतले जाते. हे सर्व पाहून ओये आणि तिचा मित्र व्यथित होतात. ती रागाने शेफ पॉलकडे त्याबाबत जाब विचारायला जाते.

पॉलच्या म्हणण्यानुसार 'हे पण खाद्यच आहे, त्या पक्ष्याचे मोल एका चिकनपेक्षा जास्त नव्हते. निव्वळ पोर्क आणि चिकन हे श्रीमंत लोकांचे जिभेचे चोचले पुरवू शकत नाही.' पण ओये म्हणते 'हे पूर्णपणे चूकीचे आहे. हा निव्वळ खाण्याचा नाही तर कायद्याचा प्रश्न आहे.' शेफ पॉल तिला म्हणतो 'तुला हे जर सांभाळता येत नसेल तर तू एक यशस्वी शेफ नाही बनू शकत.' त्याचवेळी ती मास्टर पॉल शेफच्या मोठ्या पगाराची नोकरी सोडून जाते. काही काळात ती स्वत:चे रेस्टॉरेंट थाटते. कौशल्य व मेहनतीने ओये थायलंड मधील प्रसिद्ध मास्टर शेफ बनते. एके दिवशी शहरातील अब्जाधीश असलेल्या मॅडम मिल्की स्वत:च्या बर्थडे पार्टीला एक मोठी मेजवानी ठेवते. जिथे ओये आणि पॉलला जेवण बनवायला बोलावल्या जाते. दोघेही जण पार्टीमध्ये आपल्या सहकाऱ्यासह एकापाठोपाठ वेगवेगळे खाद्यपदार्थ बनवतात. त्यांचा आस्वाद पार्टीतील श्रीमंत घेतात. कधी ओयेच्या स्टॉलवर तर कधी पॉलच्या स्टॉलवर जाऊन वेगवेगळ्या डिश चाखतात. एक प्रकारे कोणाची डिश चवदार! हा सामनाच दोघांमध्ये रंगलेला असतो. त्यात शेवटी अनुभवाच्या जोरावर पॉल ओयेवर कुरघोडी करतो. सर्वांची गर्दी त्याच्याचकडे जाते. अजूनही मीच श्रेष्ठ आहे. हे तो दाखवून देतो. तेवढ्यात एकाचवेळेस सर्वांच्या मोबाईल मधील युट्युबच्या नोटीफिकेशन बेल वाजायला लागतात. युट्यूबवर पॉल जंगलात 'त्या' पक्ष्याची डिश बनवीत असल्याची एक क्लिप आलेली असते. त्या दिवशी जंगलातून सोडून आलेल्या ओयेच्या मित्राने ती मोबाईल मध्ये चोरून शूट केली असते. नेमक्या क्षणी ती क्लिप तो व्हायरल करतो. आपला आवडता शेफ 'या' पक्ष्याला मारून डिश बनवतोय हे पाहून सर्वांची त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलते. लगेच कुणीतरी पोलीसांना बोलावून घेतो. पॉल शेफला अटकही होते. सेलेब्रिटी असणारा शेफ क्षणात ज्या पक्ष्यामुळे कैदी होतो तो पक्षी असतो ग्रेट हॉर्नबिल. थायलंड मधील 'हंगर' या चित्रपटातील हे कथानक. मागील वर्षी तो नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. त्यातील दमदार कथा व अभिनयाने तो विशेष गाजला. एका हॉर्नबिल पक्ष्यामुळे यशाच्या शिखरावर असलेला मास्टर शेफ खाली आला. चित्रपटाच्या क्लायमॅक्स मध्ये हे दाखविले आहे. ही एक फिल्मी कथा जरी असली तरी एखाद्या बाबीचे महत्व मनात ठसण्यासाठी मनोरंजन हे उत्तम माध्यम ठरते. मग ती बाब निसर्गाची, पशु पक्ष्यांची का असो ना! आणि एकदा मनात ठसली तर रटाळ वाटणारी माहितीही आपण मन लावून समजून घेतो. निसर्गात ईतर पक्ष्यांपेक्षा हॉर्नबिल जातीला जास्त महत्व आहे. हॉर्नबिलच्या जगात एकूण बासष्ट प्रजाती आहे. आफ्रिका आणि आशियायी देशामध्ये त्या दिसून येतात. हॉर्नबिलच्या आहारात फळाचा जास्त समावेश असल्याने जंगल वाढवण्यास या पक्ष्याची मोठी मदत होते. वेगवेगळ्या झाडाची फळे खाणे आणि त्याच्या बिया आपल्या विष्टाद्वारे ईतरत्र पसरविण्यात हॉर्नबिलचा पक्षीजगतामध्ये सिंहांचा वाटा असतो. आताचे जे जंगल

आपल्याला दिसते ते उभारण्यात हॉर्नबिलची विशेष भुमिका राहिली आहे. जंगलाची जैवविविधता आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी हॉर्नबिलचे संवर्धन महत्वपूर्ण मानले जाते.

अशा हॉर्नबिलच्या अभ्यास व संवर्धनासाठी थायलंडच्या वन्यजीवशास्त्रज्ञ डॉ पिलई पुन्सवाड यांनी आपली संपूर्ण कारकीर्द समर्पित केली आहे. त्यांनी थायलंड व आग्नेय आशियातील हॉर्नबिल प्रजातीचे वर्तन, आहार व घरट्यांचा अभ्यास केला. त्यावरून या पक्ष्याच्या अधिवासाचे संरक्षण व प्रजातीचे संवर्धन करण्यासाठी स्थानिक समुदाय, प्रशासन यांना सोबत घेऊन काम केले. या कार्यासाठी त्यांना जागतिक दर्जाचा 'रोलेक्स' अवार्डने सन्मानित केले आहे. डॉ. पिलईनी हॉर्नबिल संवर्धनाचे कार्य आणखी जोमाने चालण्यासाठी हॉर्नबिल रिसर्च फाउंडेशनची स्थापना केली. यातूनच दर चार वर्षानी हॉर्नबिल कॉन्फरन्सचे आयोजन केले जाते. या कॉन्फरन्सच्या माध्यमातून हॉर्नबिल संवर्धनाची रुजवात झाली. ती एक चळवळ झाली.

या चळवळीत भारताचा सहभागही मोलाचा आहे. भारतात हॉर्नबिल पक्ष्यांच्या एकून १० प्रजाती असून त्यातील ०९ प्रजाती



भारताच्या मुख्य भूमीवर तर एक प्रजाती अंदमानच्या नार्कोंडम बेटावर आढळते. हॉर्नबिल पक्षी हे सदाहरित व निम सदाहरित जंगलाचे राहावासी असल्याने त्यांच्या जास्त प्रजाती ह्या विशेषकरून पूर्वोत्तर राज्यातील जंगलात, हिमालयात आणि पूर्व व पश्चिम घाटात आढळून येतात. त्यामुळेच या पक्ष्यांना असणारे धोके व अभ्यास व संवर्धनाची गरज या भागात जास्त आहे. त्यामुळेच पूर्वोत्तर राज्यांमध्ये व दक्षिण भारतात हॉर्नबिल पक्ष्यांच्या विविध प्रजातींचा अभ्यास व संवर्धनासाठी अनेक अभ्यासकांनी व संस्थांनी अनेक प्रकल्प राबविलेत. त्यामध्ये प्रामुख्याने नेचर कन्झर्व्हेशन फाउंडेशन (NCF), SACON अशा संस्थांचा आणि अनेक संशोधकांचा ज्यामध्ये डॉ. बालसुब्रमनियन, डॉ. अपराजिता दत्ता, अमृता राणे, डॉ. दिव्या मुदाप्पा, रोहित नानिवडेकर, पूजा पवार, अमिताभ बच्चन के.एच. यांचा समावेश आहे. आपल्या महाराष्ट्रात हॉर्नबिलच्या एकूण चार प्रजाती आढळतात. यातील ग्रे हॉर्नबिल हा जंगलासोबत जंगलाबाहेरही आढळतो. म्हणजे थेट गावात व शहरात सुद्धा. याशिवाय ग्रेट हॉर्नबिल, मलबार पाईड हॉर्नबिल, मलबार ग्रे हॉर्नबिल ह्या प्रजाती प. घाटात, तर विदर्भात फक्त मलबार पाईड हॉर्नबिल, ग्रे हॉर्नबिल ह्या दोनच प्रजाती आढळून येतात. यातील ग्रे हॉर्नबिल हि प्रजाती सर्वत्र असते. जंगलाचा शेतकरी अशी ओळख असलेला मलबार पाईड हॉर्नबिल हा पेंच, ताडोबा व मेळघाट या तीन व्याघ्र प्रकल्पात आणि गडचिरोली जिल्ह्यातील निमसदाहरित घनदाट जंगलात आढळून येतो.

विदर्भात ग्रे हॉर्नबिलवर नागपुरातून डॉ. अनिल पिंपळापुरे व डॉ. राजू कसंबे ह्यांनी प्रथम अभ्यास केला, त्यावरच डॉ. राजू कसंबे ह्यांनी आपली पीएचडी केली. यापूर्वी मलबार पाईड हॉर्नबिल या पक्षाची २००३ मध्ये मेळघाटात प्रथमच नोंद झाली होती. त्यानंतर डॉ. जयंत वडतकर डॉ. राजू कसंबे व प्रा. डॉ. गजानन वाघ यांनी या पक्ष्याचा मागोवा घेऊन त्याच्या मेळघाटातील विस्ताराच्या नोंदी घेण्याचे काम केले. हे काम सुरु असतांना २००९ मध्ये पाचवी आंतरराष्ट्रीय हॉर्नबिल परिषद सिंगापूर येथे होत असल्याचे जाहीर झाले. मलबार पाईड हॉर्नबिल ग्रे हॉर्नबिल ह्या दोन प्रजातीवरील संशोधन सिंगापूर येथील परिषदेत मांडण्यासाठी त्यावेळी हे चारही संशोधक सहभागी झाले होते. या परिषदेच्या माध्यमातून जगभरातील संशोधनाची दिशा समजल्यामुळे व भारतातील व विदेशातील आघाडीच्या अभ्यासकांसोबत झालेला परिचय, यातून विदर्भातील हॉर्नबिल अभ्यास आणखी जोमाने सुरु झाला. त्यानंतर डॉ वाघ सरांनी मेळघाटातील मलबार पाईड हॉर्नबिलवर एक कालबद्ध संशोधन प्रकल्प तसेच मध्यप्रदेश मधील पेंच व्याघ प्रकल्पातील याच प्रजातीच्या खाद्य, प्रजनन व विणीचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास प्रकल्प राबविला. या साऱ्याचा परिपाक म्हणजे फिलिपिन्स व सारावाक, मलेशिया येथे पार पडलेल्या सहाव्या व सातव्या परिषदेत डॉ. वडतकर प्रा. डॉ. वाघ सहभागी झाले होते.

आताची बँकाँकची ही आठवी कॉन्फरन्स. जगभरातील वीस देशातील जवळपास दीडशे हॉर्नबिल संशोधक सहभागी झाले होते. यामध्ये भारतातील आठ संशोधक. त्यापैकी विदर्भातून आम्ही चौघे. प्रा.डॉ. वाघ यांच्यासोबत यावेळी त्यांच्या प्रा. निखील बोरोडे व प्रतिक चौधरी या संशोधन विद्यार्थ्यांसमवेत सहभागी झाले. मी तसा पेशाने व्हेटरनरीयन, परंतु हौशी पक्षी अभ्यासक म्हणून मी सुद्धा या चमुसोबत सहभागी झालो. या निमित्ताने जगभरात चालणारे संशोधन व पक्षी संवर्धन बाबतची सद्यस्थिती माहिती करून घेता आली. आणी या संशोधनातील माझे योगदान सुद्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडल्या गेले.

तीन दिवसीय हॉर्नबिल कॉन्फरन्सचे आयोजन कासार्ट

विद्यापीठात होते. थायलंड मधील सगळ्यात मोठे विद्यापीठ म्हणून कासार्टची ओळख आहे. या विद्यापीठ स्थापनेचा मुख्य उद्देश शेतीविषयक विज्ञानशी संबधीत असणारे विषय शिकविणे आहे. विद्यापीठाचे संस्थापाक प्रिन्स नराधिप बोंगस्पबंध यांच्या नावावरून हे नाव देण्यात आले. ज्यांना राजा राम सहावा यांनी 'कॅसेटसर्ट' ही पदवी दिली होती, थाई भाषेत कॅसेट म्हणजे शेती. सार्ट चा अर्थ सायन्स अथवा शिक्षण. कॉन्फरन्स हॉल विद्यापीठाच्या फॉरेस्ट्री डीपार्टमेंट मध्ये वरच्या मजल्यावर होता. गेटवर रजिस्ट्रेशनचा टेबल दिसला. तिथे जाऊन पहिले आमच्या नावाची नोंदणी करून घेतली. आयकार्ड व कीट ताब्यात घेतले. बाजुला हॉर्नबिल कॉन्फरन्सचा लोगो लावलेला मोठा वेलकम स्टॅन्डी दिसला. छान फुलांनी सजवलेला. हॉलच्या आत जायच्या अगोदर फोटोसाठी स्टॅन्डीच्या बाजूने उभे राहिलो. आयकार्ड गळ्यात असलेले स्वत:चे वेगवेगळ्या पोजमधले फोटो काढून घेतले. कॉन्फरन्सच्या फोटोत सोशल मिडीयावर मिरविणे हा या मागचा प्रामाणिक हेतु.



****




# ३६ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन

**२३ आणि २४ डिसेंबर २०२३ सांगली.**

**संमेलनस्थळ : शांतीनिकेतन, लोकविद्यापीठ माधवनगर रोड सांगली.**

**संमेलनाचा मुख्य विषय (थीम)** पिसे आणि पिसारा.

**उपविषय :** पंचबर्डींग, शहरीकरणाचे पक्षीजीवनावर होणारे परिणाम, शेती परिसरातील पक्षी आणि त्यांची भूमिका, लोकसहभागातून पक्षीसंवर्धन असे विषय चर्चिले जातील आणि या विषयावरील शोधनिबंध सादर केले जातील आणि तज्ञांची व्याख्याने /सादरीकरण होतील.

**सकाळ सत्र : उदघाटन समारंभ – दिनांक: २३ डिसेंबर २०२३ सत्र पहिले**

डॉ. पूर्णिमा देवी बर्मन : मोठा क्षत्रबालक (Greater adjutant) संवरक्षण संवर्धन या विषयावर सादरीकरण.

श्रीमती. इशा मुन्शी : (Fonder Feather Library) पक्ष्यांची पिसे.

**दिनांक २३ डिसेंबर २०२३ सत्र दुसरे– दुपारी २ ते ४.**

शोध निबधांचे सादरीकरण. डॉ. भरुचा कै. रमेश बिडवे यांच्या आठवणी सांगतील.

**दिनांक २३ डिसेंबर २०२३ सत्र तिसरे संध्याकाळ – वेळ ४.३० ते ६.००.**

आज अनेक तरुण संशोधक वेगवेगळ्या प्रकल्पावर फिल्डरिसर्चर म्हणून काम करीत आहेत. त्यांनी करिअर म्हणून निवडलेले क्षेत्र आव्हानात्मक आहे. त्यांच्या प्रकल्पाविषयी आणि त्यांच्या कामाविषयी जाणून घेण्याची सर्वांनाच इच्छा असते. अशा चार ते पाच संशोधकांचे सादरीकरण आयोजित केले आहे.

वेळ ६ ते ८ पक्षिमित्र संघटनेची वार्षिक सभा आणि संघटनेचे इतर कार्यक्रम.

**दिनांक २४ डिसेंबर दिवस दुसरा. सत्र पहिले –** सकाळी ६.३० ते ८.३० सांगली परिसरात पक्षी निरीक्षण

**सत्र दुसरे** १० ते १ – १० ते ११.३० विद्यार्थी सहभागीसाठी राखीव. त्यांचे शोधनिबंध सादर होतील.

११.३० ते १ – शरद आपटे यांच्या वरील लघुपट तसेच इतर महत्वाच्या विषयावरील व्याख्याने/ सादरीकरण.

**सत्र तिसरे** – २ ते ४ – २ ते ४ खुले अधिवेशन, सत्कार आणि समारोप.

इच्छुकांसाठी सह्याद्री टायगर रिझर्व भेट (२४ डिसेंबर रोजी सायंकाळी जावून २५ डिसेंबर दुपारी परत) आयोजित केली जाणार आहे.

२५ डिसेंबर २०२३ सागरेश्वर अभयारण्य भेट सकाळी ६.०० वाजता निघून दुपारी १२ पर्यंत परत. दोन्हीचा तपशील लवकरच जाहीर केला जाईल.

Contact for More detail. :- **Sharad Apte** - Director, For Bird song
birdsong.sangli@gmail.com WhatsApp **9890384400**

# टपाल तिकिटांच्या दुनियेत
# सारस क्रौंच
## Sarus Crane (Grus antigone)

सारस क्रौंच जगात आढळून येणाऱ्या १५ क्रौंच प्रजातींपैकी सहा प्रजाती भारतामध्ये आढळून येतात. त्यापैकी सारस क्रौंच भारतात मोठ्या प्रमाणावर नसला तरी विपुल प्रमाणात हा आढळून येतो. हा भारतातील स्थानिक क्रौंच आहे. सारस पक्ष्याची उंची माणसाएवढी म्हणजे ५ फुटाच्या आसपास असते. या पक्ष्याला ओळखण्याची मुख्य खूण म्हणजे लांबलचक शिडशिडीत पाय, उंच मान आणि मस्तकाच्या मागील भागावर व गळ्याच्या वरच्या भागावर असलेली लालभडक पिसे तसेच पाठ, पोट व पंखावर राखाडी निळसर पिसे असतात. मात्र शेपटीकडील पिसे पांढऱ्या रंगाची असतात. चोच लहानशी करड्या रंगाची असते. हा क्रौंच नेहमी त्याच्या जोडीदाराबरोबर असतो व आयुष्यभर बहुतांशी एकच जोडीदार पसंत करतो. या पक्ष्याचे वसतीस्थान पाणथळी जागा, तळी, सरोवर व नदीचे काठ भात शेतीचे स्थान येथे आढळून येते. हा पक्षी नाकतोडे, इतर कीटक, लहान जलचर आणि वनस्पती खाणे पसंत करतो. तसेच इतर पक्ष्यांची अंडी, कासवांची अंडी, साप, कासव यांचाही सारसाचा भक्ष्यात समावेश आहे. भाताच्या उभ्या शेतातील धान्य दाणे खाण्यापेक्षा कापणीनंतर जमिनीवर पडलेले धान्य खाणे पसंत करतो म्हणून शेतकरी सारस पक्ष्याला पिकांचा शत्रू समजत नाही. सारसांचे प्रियाराधन डोळ्यास सुखावणारा प्रसंग असतो. प्रियाराधन करणारी जोडी आकाशाकडे मान उंचावत गळ्यातून तीव्र स्वर काढत आपले विशाल पंख पसरवत लक्ष वेधून घेतात. जुलै ते ऑक्टोबर म्हणजे पावसाळा हा त्यांचा विणीचा काळ असतो. भात खाचरामध्ये किंवा दलदलीमध्ये सारस पाण वनस्पती व इतर वनस्पतीच्या काटक्यांच्या सहाय्याने घरटे बांधतो. सारस मादी एक किंवा दोन अंडी घालते. ही अटी मातकट दुधाळ रंगाची चार इंच लांब व अडीच इंच रुंद असतात.भारतामध्ये सारस पक्षी उत्तर भारतात जास्त प्रमाणात आढळून येतो. तसेच मध्यप्रदेश, गुजराथ, राजस्थान व ईशान्य भारतातही आढळून येतो. महाराष्ट्रात प्रामुख्याने भंडारा, गोंदिया व बालाघाट जिल्ह्यात सारस बऱ्या प्रमाणात आढळतो. तरी त्याच्या अस्तित्वास धोका असल्याने तेथील स्थानिक शेतकरी, पक्षिमित्र संघटना सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी अथक प्रयत्न करीत आहेत. भारतीय संस्कृतीमधे सारस पक्ष्याला मानाचे स्थान आहे. असे मानले जाते की वाल्मिकी ऋषींना सारस पक्ष्याच्या जोडीकडे पाहत पहिले काव्य सुचले व रामायणाची निर्मिती झाली. अशा या सुंदर पक्ष्यावर भारतीय टपाल विभागातर्फे २००० साली पशु पक्ष्यांवर आधारीत नियमित वापराच्या तिकीटाचा संच प्रकाशित केला. त्यामध्ये एक रूपया किमतीचे आकर्षक टपाल तिकीट प्रकाशित केले आहे. तसेच १२ डिसेंबर २०११ रोजी उत्तर प्रदेश टपाल विभागातर्फे पाणथळ प्रदेशावर विशेष आवरण केले, त्यावर सारस पक्ष्याच्या जोडीचे सुंदर चित्र दिसत आहे. त्याचप्रमाणे बर्मा व ऑस्ट्रेलिया या देशाच्या टपाल तिकिटांवर सारस क्रौंच विराजमान झालेला दिसून येतो.

**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in








**Birds & Mammals**
**Sculpture**




**Bird Calls**
**CDS**



**Singing Bird**
**Clock**

# Wildlifekart.com

## Online Shop for Nature and Wildlife Lovers

wildlifekart@gmail.com 7400488996

- 1,000 + Birds and Wildlife related products
- 100 + Products categories
- Information of various Wildlife Resorts across India, Wildlife Tours and Wildlife News



**Birds & Wiildlife**
**Tshirts**



**Birds and Mammals**
**Lapel Pins**



**Beautiful**
**Bird Nests**

# जंगलहाईक तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या पक्षीनिरीक्षण सहली



भारतातील महत्वाच्या पक्षी क्षेत्रातील पक्षीनिरीक्षण







## फक्त पुढीलपैकी सहलीमध्ये काही जागा शिल्लक

- कच्छ चे छोटे रण - गुजरात : १६-१९ नोव्हेंबर २०२३
- भीमाशंकर - महाराष्ट्र : २९-३१ डिसेंबर २०२३
- थत्तेकड व मुन्नार - केरळ : ३-७ जानेवारी २०२४
- जामनगर - गुजरात : १०-१३ जानेवारी २०२४
- पूर्व सिक्कीम, गजोलडोबा - सिक्कीम : २२-२८ जानेवारी २०२४
- वालाँग व नामदफा - अरुणाचल प्रदेश : ३० जानेवारी- ८ फेब्रुवारी २०२४
- सातताल-नैनिताल-मनिला - उत्तराखंड : १९-२४ फेब्रुवारी २०२४
- सेंचल दार्जिलिंग - पश्चिम बंगाल : २७ फेब्रुवारी- ३ मार्च २०२४
- दक्षिण अंदमान - अंदमान बेट : ३-८ मार्च २०२४
- मानस राष्ट्रीय उद्यान - आसाम : २७-३० मार्च २०२४
- मिश्मी हिल्स - अरुणाचल प्रदेश : ३१ मार्च -७ एप्रिल २०२४
- भितरकणीका व मंगलाजोडी - ओरिसा : १२-१६ एप्रिल २०२४



या व अशा अनेक आगामी पक्षीनिरीक्षण सहलींसाठी आम्हाला आजच संपर्क करा.

**आमची काही वैशिष्ट्ये**

- प्रदीर्घ अनुभवी गाईड्स
- हजाराहून अधिक समाधानी सहभागी पर्यटक
- अधिवासाचा अचूक अभ्यास करून सहलींचे आयोजन
- छायाचित्रणाचे मार्गदर्शन
- दररोज पाहिलेल्या पक्षांचे अभ्यासपूर्ण विवेचन व चर्चा
- सहलीमध्ये मर्यादित पर्यटक व वैयक्तिक लक्ष

अधिक माहितीसाठी संपर्क : अविनाश भगत- 9892061899 junglehike Junglehike Tours

# अमरावतीत उलटचोच तुतारी पक्ष्याचे अवेळी स्थलांतरण

अमरावती शहरालगत बोरगाव धरणावर अभिमन्यू आराध्य, प्रशांत निकम पाटील, वैभव दलाल आणि मनोज बिंड यांनी उलटचोच तुतारी या पक्ष्याची नुकतीच महत्वपूर्ण नोंद केली आहे. अमरावती जिल्ह्यात वरुड आणि यवतमाळ येथे यापूर्वी घेण्यात आलेल्या तुरळक नोंदी उन्हाळ्यात म्हणजे परतीच्या स्थलांतरणाच्या वेळी घेण्यात आल्या आहेत. मात्र हिवाळी स्थलांतरणाच्या सुरुवातीलाच सप्टेंबर महिन्यात आश्चर्यकारकरित्या करण्यात आलेली नोंद होणे म्हणजे जागतिक तापमानातील व हवामानातील बदलाचा परिणाम असण्याची शक्यता आहे.



## माहितीचा उजाळा उत्तरे

१. मोठा रोहित
२. ऑस्ट्रेलिया
३. सहा
४. बर्ड कॉन्झवेशन सोसायटी गुजरात
५. अँडीज पर्वतमाला
६. गुजरात
७. अँडीजचा रोहित
८. २६ एप्रिल
९. मॅथीवडरसन
१०. पॉल रोज

Book Post

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षिमित्र
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन